# *माझी जीवन कथा*

आपण प्रार्थनेसाठी फक्त काही क्षण आपली मस्तके झुकवूया.

आमच्या दयाळू स्वर्गीय पित्या, हा खरोखरीच आमच्याकडे, आमचा देव आणि तारणकर्ता, तुजकडे जाण्याचा विशेषाधिकार आहे. *तू किती महान आहेस*, हे अद्भुत गाणे ऐकून, आम्हाला आनंद होतो कारण आम्हाला माहीत आहे की तू महान आहेस. आणि आम्ही प्रार्थना करतो की आज दुपारी, जेव्हा आम्ही तुझ्याविषयी बोलत अहोत तेव्हा तुझी महानता आमच्यावर पुन्हा नव्याने प्रकट होवो. आणि बऱ्याच वर्षांत प्रथमच, माझ्या वाट्याला हा समय आला आहे की मी माझ्या आयुष्याच्या भूतकाळावर नजर टाकावी, आणि प्रभू, मी प्रार्थना करतो की ह्या समयी, तु मला शक्ती आणि—आणि ज्या गोष्टींची मला आवश्यकता आहे ते प्रदान कर. आणि माझ्या आयुष्यातील सर्व चुका इतरांसाठी केवळ एक मैलाचा दगड असू दे, जो त्यांना तुझ्या अधिक जवळ आणील. प्रभु, हे प्रदान कर. पाप्यांना काळाच्या वाळूवरील पावलांचे ठसे दिसू दे, आणि ते तुझ्याकडे वळू दे. या गोष्टी आम्ही प्रभू येशूच्या नावाने मागतो. आमेन.

तुम्ही बसू शकता.

2 [भाऊ ग्लोव्हर म्हणतात, "तुम्ही सुरुवात करण्यापूर्वी या रुमालांसाठी प्रार्थना कराल का?"—संपा.] मला आनंद होईल. ["प्रार्थना करण्यासाठी *ते* आणि *हे* आहेत."] ठीक आहे, श्रीमान, धन्यवाद. कारण ब्रदर ग्लोव्हर, ह्या संत पुरुषाला, मी काही वर्षांपासून ओळखतो, काल संध्याकाळी त्यांच्या सोबत काही वेळ राहण्याची सुसंधी मला मिळाली. आणि त्याने मला त्याच्या विषयी सांगितले...त्यांना काही वेळ, विश्रांतीसाठी, पडावे लागले. आणि आता, आयुष्याच्या पंचाहत्तराव्या वर्षी, परमेश्वराच्या सेवेत पुन्हा रुजू होत आहेत. मला ह्या समयी इतकाही थकवा जाणवत नाही जितका मी हे ऐकण्यापूर्वी वाटत होता. मला वाटले की मी थकलो होतो, पण मला—मला वाटत नाही की मी थकलो आहे. त्याने नुकतेच माझ्याकडे पाकीटांच्या स्वरूपा मध्ये—मध्ये, काही रुमाल येथे ठेवले आहेत, आणि अशा प्रकारे, जिथे ते आत आहेत आणि आधीच मागे ठेवलेले आहेत.

3 आता, तुमच्यापैकी कोणीही रेडिओ प्रसारणाच्या परिसरात, किंवा येथे, ज्यांना ह्या रुमालांपैकी एक हवा असेल, आणि तुम्ही...द एंजेलस टेम्पल सदैव त्यांना सतत, बाहेर पाठवत असते. तुम्ही इथे एंजेलस टेम्पल ह्यांना लिहू शकता आणि ते त्यावर प्रार्थना करतील, कारण मी तुम्हाला खात्री देतो की तो पवित्र शास्त्रलेख आहे. हे देवाचे एक अभिवचन आहे.

4 आणि जर मी तुमच्यासाठी एक प्रार्थना करावी असे तुम्हाला वाटत असेल, तर, मला ते करण्यास आनंद होईल. तुम्ही मला पोस्ट ऑफिस बॉक्स 3–2–5, 325, जेफर्सनविले, स्पेलिंग जे–ई–एफ–एफ–ई–आर–एस–ओ–एन–वी–आई–एल–एल–ई, ह्यावर लिहा. जेफर्सनविले, इंडियाना. किंवा जर तुम्ही पोस्ट ऑफिस बॉक्स लक्षात ठेवू शकत नसाल, तर फक्त "जेफर्सनविले" लिहा. हे एक लहान शहर आहे, लोकसंख्या अंदाजे पस्तीस हजार आहे. तिथे सगळे मला ओळखतात. आणि म्हणून रुमालावर प्रार्थना करून तुम्हाला पाठवण्यास आम्हाला आनंद होईल.

5 आणि, आता, आम्हाला हे करण्यात मोठे यश मिळाले आहे, कारण...तुम्हाला त्या सोबत एक छोटेसे छापील नमुन्याचे पत्र मिळेल, जगभरातील लोक दररोज सकाळी नऊ

वाजता, आणि बारा वाजता आणि तीन वाजता प्रार्थना करतात. आणि तुम्ही कल्पना करू शकता, सर्वत्र जगाच्या आड, त्यांना ही प्रार्थना करण्यासाठी रात्री किती वाजता उठावे लागत असेल. तर जर हे सर्व दहा हजार, आणि हजारो पटीने, या सेवकाईसाठी त्याच वेळी देवाला प्रार्थना पाठवत आहेत, तुमचा आजार, देव मुळीच तो अमान्य करू शकत नाही. आणि म्हणून आता आम्ही, जसे मी म्हणतो, आमच्याकडे कोणतेही कार्यक्रम नाहीत, आम्हाला एक कवडीही पैसा नको. आम्ही फक्त...जर आम्ही तुम्हाला मदत करावी, आम्ही त्यासाठीच येथे आहोत. आणि आपण...

कोणीतरी रुमालांचा दुसरा गड्डा प्रार्थनेसाठी आणत आहे.

6 आता, जर तुमच्याकडे रुमाल नसेल जो तुम्हाला पाठवायचा होता, कसेही असो, तर तुम्ही फक्त लिहा. जर तुम्हाला आता त्याची गरज नसेल, तर ते प्रेषितांची कृत्ये ह्या पुस्तकात, बायबलमध्ये, 19व्या अध्यायात ठेवा. आणि हे एका छोट्या पांढऱ्या रिबनचे स्वरूपात असेल जे तुम्हाला पाठवले जाईल, आणि काही सुचनांसह की तुमच्या पापांची प्रथम कबुली कशी द्यावी. आणि (धन्यवाद) आपल्या पापांची कबुली कशी द्यावी. प्रथम देवाबरोबर आपल्याला योग्य केल्याशिवाय तुम्ही देवाकडून काहीही मिळवण्याचा प्रयत्न करू नये. समजले? आणि मग तुम्हाला यामध्ये तुमच्या शेजाऱ्यांना आणि तुमच्या पाळकांना बोलावण्याची सूचना देण्यात आली आहे. तुमच्या मनात कोणाच्याही विरोधात काही असेल, तर ते आधी ठीक करा, आणि परत या. आणि मग प्रार्थना करा, तुमच्या घरी प्रार्थना सभा घ्या, आणि हा रुमाल तुमच्या आतील कपड्याच्या खाली चिकटवा, मग देवावर विश्वास ठेवा. आणि त्याच तीन तासात, दररोज, जगभरातील लोक प्रार्थना करत राहतील, जगभरात एक साखळी असेल.

7 आणि आता ते तुमचे आहे, पूर्णपणे विनामूल्य, असेच पाठविले जाते. आणि—आणि, आता, आम्ही तुम्हाला परत पैसे मागण्यासाठी किंवा आमच्याकडे असलेला काही कार्यक्रम सांगण्यासाठी तुम्हाला परत लिहिणार नाही. आमची इच्छा आहे की तुम्ही ह्या प्रार्थना कार्यक्रमात सहाय्य करावे, परंतु ह्या खेरीज आम्हाला तुमच्याकदुण कसलेच सहाय्य नकोय—नकोय. समजले? म्हणून...आमचा उद्देश तुमचा पत्ता मिळवणे हा नाही, तर केवळ ह्यात तुम्हाला सामील करतोय आणि ही एक परमेश्वराची सेवा आहे, जी आम्ही पुढे नेण्याचा प्रयत्न करीत आहोत.

8 आता आपण आपली मस्तके प्रार्थनेसाठी लववूया. आणि जर तुम्ही रेडिओ प्रसारण ऐकत असाल, तर तुमचा रुमाल तिथे ठेवा, आम्ही प्रार्थना करत असताना त्यावर तुमचा स्वतःचा हात ठेवा.

9 दयाळू प्रभु, आम्ही तुझ्याकडे ही छोटी पाकिटे आणत आहोत, कदाचित त्यांच्यापैकी काही बाळासाठी कदाचित लहान बनियान आहेत किंवा—किंवा काही लहान यातील वस्त्रे आहेत, किंवा कदाचित बुटांची एक लहान जोडी, किंवा—किंवा काही वस्तु, एक रुमाल, जो आजारी आणि पीडितांकडे जातो. प्रभु, तुझ्या वचनानुसार आम्ही हे करतो. कारण आम्ही प्रेषितांची कृत्ये ह्या पुस्तकात वाचतो, की त्यांनी तुझा सेवक पौल याच्या अंगावरून, रुमाल व फडकी आणली, कारण तुझा आत्मा त्या मनुष्यावर होता असा त्यांचा विश्वास होता. आणि लोकांतून अशुद्ध आत्मे निघून गेले, आणि त्यांनी विश्वास ठेवल्यामुळे, पीडा व रोग त्यांना सोडून गेले. आणि आता आम्हाला समजले की, प्रभु, आम्ही संत पौल नाही, परंतु आम्हाला माहित आहे की तू अजूनही तोच येशू आहेस. आणि आम्ही प्रार्थना करतो की तु या लोकांच्या विश्वासाचा आदर करशील.

10 आणि एकदा असे म्हटले होते की जेव्हा इस्राएल, देवाची आज्ञा पाळण्याचा प्रयत्न करत होता, तेव्हा तो एका सापळ्यात अडकला होता, त्यांच्या समोर समुद्र, दोन्ही बाजूला पर्वत, आणि फारोचे सैन्य जवळ येत होते. आणि एकाने म्हटले आहे, की "देवाने त्या अग्निस्तंभातून, क्रोध दृष्टीने खाली पाहिले, आणि समुद्र घाबरला आणि स्वतःहून मागे वळला, आणि इस्राएलला वचनदत्त देशात पार जाण्यासाठी मार्ग तयार केला."

11 हे प्रभु, पुन्हा खाली पहा, जेव्हा ह्या वस्तु तुझ्या जिवंत वचनाच्या स्मरणार्थ आजारी देहांवर ठेवल्या जात आहेत. आणि रोग घाबरू लागोत, तुझा पुत्र, येशू, जो या प्रायश्चितासाठी मरण पावला, त्याच्या रक्तातून पहा. आणि शत्रू घाबरो आणि निघून जावोत, म्हणजे हे लोक तुझ्या अभिवचनाचे भागीदार बनू शकतील, ते "सर्व गोष्टींपेक्षा," ती तुझी इच्छा आहे "की आम्ही आरोग्यामध्ये समृद्ध व्हावे." पित्या, ते प्रदान कर, कारण आम्ही ते त्या सह—ते आपल्या अंत:करणात त्या वृत्तीसह पाठवीत आहोत. आणि हेच आमचे उद्दिष्ट आहे. आम्ही ते येशू ख्रिस्ताच्या नावाने पाठवतो. आमेन.

धन्यवाद, भाऊ ग्लोव्हर. धन्यवाद, श्रीमान.

12 आता, आज रात्री पुनरुज्जीवनाचा हा भाग बंद होत असल्याने, तो प्रसारित होईल की नाही माहित नाही, पण मी रेडिओ श्रोत्यांना (जर नसेल तर) सांगू इच्छितो, अनेक, अनेक वर्षांपासून मी घेतलेल्या सर्वोत्कृष्ट सभांपैकी ही एक आहे. मी बऱ्याच काळापासून घेतलेल्या मध्ये ही एक विश्वसनीय, मनावर ठसा उमटवणारी, सर्वात प्रेमळ, सहकार्य देणारी सभा आहे.

13 [एक भाऊ म्हणतो, "आम्ही साडेचार वाजेपर्यंत प्रसारण करतो, भाऊ. आणि ते तुमचे ऐकत आहेत, संपूर्ण दक्षिण कॅलिफोर्नियामध्ये, बेटांवर, आणि जहाजांवर. त्यांच्याकडून आम्हाला संदेश मिळतात. आणि म्हणून तुम्हाला हजारो आणि दहा हजारो पटीने प्रेक्षक मिळाले आहेत."—संपा.] धन्यवाद, श्रीमान. ते खूप चांगले आहे. ते ऐकून आनंद झाला. देव तुम्हा सर्वांना आशीर्वाद देवो.

14 आणि एंजेलस मंदिरासाठी माझ्या हृदयात नेहमीच प्रेमळ स्थान आहे, येशू ख्रिस्ताच्या संपूर्ण सुवार्तेसाठी त्याच्या भूमिकेबद्दल. आणि, आता, ते—ते आता माझ्यासाठी अधिक वैयक्तिक असल्याचे दिसते. सभेनंतर सगळ्यांना भेटून, त्यांचा सुरेख भाव पाहून, असे वाटते की, मला असे वाटते की मी पूर्वी असायचो त्यापेक्षा मी अगदी तुमच्यापैकी एक आहे. देव तुम्हाला आशीर्वाद देवो, हीच माझी प्रार्थना आहे. आणि... [प्रेक्षक टाळ्या वाजवतात—संपा.] धन्यवाद, विनम्र.

15 आता, हे मला सांगण्यात आले होते की आज मी तुमच्याशी थोडा वेळ ह्या विषयावर बोलावे: *माझी जीवन कथा.* ती एक—एक माझ्यासाठी कठीण गोष्ट आहे. बऱ्याच वर्षांनंतर मी प्रथमच याकडे जाण्याचा प्रयत्न केला आहे. आणि माझ्याकडे सविस्तरपणे सांगण्यास वेळ नसणार, परंतु त्याचा केवळ काही भाग. आणि, इथे, मी अनेक चुका केल्या आहेत, अनेक चुकीच्या गोष्टी केल्या आहेत. आणि माझी इच्छा आहे की, तुम्ही जे रेडिओ प्रसारण ऐकत आहात आणि तुम्ही जे उपस्थित आहात, की तुम्ही माझ्या चुकांना अडखळणारे–दगड मानणार नाही, तर तुम्हाला प्रभु येशूच्या जवळ आणण्यासाठी मैलाचे–दगड मानाल.

16 मग, आज रात्री, प्रार्थना पत्रके आज रात्री आरोग्य सभेसाठी दिले जातील. आता, जेव्हा आपण *आरोग्य सभेबद्दल* बोलतो, याचा अर्थ असा नाही की आपण एखाद्याला बरे करणार आहोत, तर आपण "एखाद्यासाठी प्रार्थना करणार आहोत." देव आरोग्य देतो. प्रार्थनेचे उत्तर देण्यासाठी, तो सदैव माझ्याशी फारच कृपाळू राहिला आहे.

17 आणि मी इथे काही समयापूर्वी एका प्रसिद्ध सुवार्तिकाच्या व्यवस्थापकाशी बोलत होतो, आणि—आणि ह्या सुवार्तिकाने आजारी लोकांसाठी प्रार्थना का केली नाही असे विचारण्यात आले. आणि त्या सुवार्तिकाने माझ्या—माझ्या सभेच्या व्यवस्थापकाला उत्तर दिले, म्हटले, "जर…" हा सुवर्तिक दैवी आरोग्यावर विश्वास ठेवतो. परंतु जर तो आजारी लोकांसाठी प्रार्थना करू लागला, तर ते त्याच्या सेवेत व्यत्यय आणेल कारण त्याला चर्चद्वारे प्रायोजित करण्यात आले आहे. पुष्कळ मंडळ्या, आणि त्यांच्यापैकी पुष्कळ जण, दैवी आरोग्यावर विश्वास ठेवीत नाहीत.

18 म्हणून मला त्या सुवार्तिकाबद्दल सन्मान आणि आदर आहे कारण तो त्याचे स्थान, त्याचे कर्तव्य राखीत आहे. तो कदाचित…मी त्याची जागा कधीच घेऊ शकत नाही, आणि तो माझी जागा घेऊ शकेल की नाही याबद्दल मला शंका आहे. आपल्या सर्वांना देवाच्या राज्यात एक स्थान आहे. आम्ही सर्व एकत्र बांधलेलो आहोत. निरनिराळी दाने, परंतु एकच आत्मा. निरनिराळे प्रकटीकरण, मला म्हणायचे होते, परंतु एकच आत्मा.

19 आणि, आता, आज रात्रीची सभा सुरू होईल…मला वाटते की सभा साडेसहा वाजता सुरू होईल असे ते म्हणाले. आणि, आता, जर तुम्ही रेडिओ क्षेत्रात असाल, तर हे ऐकण्यासाठी या. ते …ते सुंदर असेल, ते नेहमीच असते.

20 आणि मग मला असे म्हणायचे आहे की या सभेनंतर लगेच प्रार्थना पत्रके दिली जातील, ही सभा समाप्त होताच, जर तुम्ही येथे असाल आणि तुम्हाला प्रार्थना पत्रक हवे असेल. मला तिथे काही क्षणांपूर्वीच सूचना देण्यात आली होती, माझा मुलगा किंवा श्रीमान मर्सियर किंवा श्रीमान गोड, ते प्रार्थनापत्रके देतील. फक्त आपल्या जागेवर रहा. सभा समाप्त होताच, फक्त आपल्या जागेवर रहा त्यामुळे मुले रांगेतून उतरू शकतात आणि दिलेली प्रार्थना पत्रके शक्य तितक्या लवकर मिळवू शकतात. ते बाल्कनीमध्ये किंवा मजल्यावर, कुठेही, तळ मजल्यावर किंवा तुम्ही कुठेही असाल, फक्त तुमच्या जागेवर राहा आणि मुलांना कळेल की तुम्ही प्रार्थना पत्रका साठी आला आहात. आणि मग आज रात्री आपण आजारी लोकांसाठी प्रार्थना करणार आहोत. आणि जर परमेश्वराने माझे विचार बदलले नाहीत, तर मला आज रात्री या विषयावर प्रचार करायचा आहे, *जर तुम्ही आम्हाला पिता दाखवाल, तर ते आम्हाला पुरेसे होईल.*

21 आता मला आज दुपारी एक वचन वाचायचे आहे, *जीवन कथा* सुरू करण्यासाठी, हिब्रूंच्या पुस्तकात आढळते, 13 व्या अध्यायात, आणि आपण येथून सुरुवात करूया… मी 12व्या वचना बद्दल बोलेन.

> *म्हणून येशूनेहि, स्वरक्ताने लोकांना पवित्र करावे म्हणून, वेशीबाहेर मरण सोसले.*
>
> *तर आता त्याचा अपमान सोशीत, तळाबाहेर आपण…त्याच्याकडे जाऊया.*
>
> *कारण* आपल्याला *येथे स्थायिक नगर नाही, परंतु आपण एक जे पुढे येणार आहे त्याची वाट पाहत आहोत.*

22 आता तो अशा प्रकारचा मजकूर आहे. कारण, तुम्ही पाहता, जरी ती जीवन कथा आहे, किंवा काहीही मनुष्याशी संबंधित आहे, तरी आम्ही त्याचा गौरव करीत नाही, आणि विशेषतः एक—एक मनुष्याचा भूतकाळ, जर तो माझ्यासारखाच गडद असेल. पण मला वाटते, जर आपण पवित्र शास्त्रलेख वाचला, तर देव पवित्र शास्त्रालेख आशीर्वादित करील. आणि माझा विषय आहे:

*की आपल्याला येथे स्थायिक नगर नाही, परंतु आपण एक जे पुढे येणार आहे त्याची वाट पाहत आहोत.*

23 आता, मला माहित आहे की तुम्हाला लॉस एंजेलिस खूप आवडते. तुम्हाला असण्याचा अधिकार आहे. ते एक महान, सुंदर शहर आहे. त्याचे धुके आणि आणखी–काय, तरीही ते एक सुंदर शहर, उत्तम हवामान आहे. पण हे शहर स्थायिक असू शकत नाही, त्याचा अंत असणार आहे.

24 मी रोममध्ये (जेथे महान सम्राट होते) गेलो आहे आणि त्यांना वाटले की ती शहरं अमर बनतील, आणि त्याचे अवशेष शोधण्यासाठी वीस फूट खाली खणावे लागते.

25 फारोचे मोठे राज्य होते तिथे मी जाऊन आलो आहे, आणि महान फारोचे राज्य कुठे होते ते शोधण्यासाठी तुम्हाला जमिनीत खोदून पहावे लागेल.

26 आपल्या सर्वांना आपल्या शहराचा आणि आपल्या ठिकाणाचा विचार करायला आवडतो. पण, लक्षात ठेवा, ते कायम टिकू शकत नाही.

27 मी लहान असताना एका मोठ्या मेपलच्या झाडावर जायचो. माझ्या देशात आमच्याकडे खूप टणक लाकूड आहे. आणि मग आमच्याकडे ही मॅपलची झाडं होती, साखर मॅपल, आणि ज्याला आम्ही "टणक मॅपल" आणि "मऊ मॅपल असे म्हणतो." हे महाकाय वृक्ष, ते सर्वात सुंदर झाड होते. आणि जेव्हा मी शेतातून आत येई, गवतात काम करीत असे आणि—आणि कापणीच्या हंगामात, मला या मोठ्या झाडाखाली जायला आणि—आणि त्याखाली बसायला आणि—आणि वर पहायला आवडत असे. आणि मी त्याच्या मोठ्या, महाकाय फांद्या वाऱ्यावर डोलताना, खूप मोठे खोड पाहू शकत होतो. आणि मी म्हणालो, "तुम्हाला माहीत आहे, मला विश्वास आहे की हे झाड शेकडो आणि शेकडो वर्षे येथे असेल." खूप समय झाला नाही मी त्या प्राचीन झाडाकडे एक नजर टाकली, ती केवळ एक फांदी राहिली आहे.

28 "येथे आपल्याला स्थायिक नगर नाही." नाही, पृथ्वीवर तुम्ही पाहू शकता असे काहीही कायम राहणार नाही. त्याचा ही शेवट होईल. नाशवंत असलेल्या प्रत्येक गोष्टीला अमरत्वाचा मार्ग द्यावा लागतो. त्यामुळे आपण आपले महामार्ग कितीही चांगले बांधले, कितीही सुरेख बांधले तरीही, हे सर्व निघून जाणार आहेत, कारण इथे काहीही कायम असू शकत नाही. फक्त अदृश्य तेच कायम असणार आहे.

29 मला आठवतं आम्ही ज्या घरात राहायचो, ते एक जुनं लाकडाचे घर मातीने सारवलेल होतं. मी...कदाचित अनेकांनी मातीने सारवलेले घर कधी पाहिले नसेल. पण ते सर्व मातीने सारवलेले होते, आणि जुन्या घरात मोठे मोठे लाकडाचे ओंडके होते, मला वाटले ते घर शेकडो वर्षे उभे राहील. पण, तुम्हाला माहिती आहे, आज ते घर जिथे उभे आहे तो एक गृहनिर्माण प्रकल्प आहे. तो खूप वेगळा आहे. सर्व काही बदलत आहे. परंतु...

30 आणि मी माझ्या वडिलांना पाहायचो, ते एक ठेंगणा, लठ्ठ, खूप मजबूत मनुष्य होता, आणि तो मला माहीत असलेल्यात सर्वात बलवान व्यक्तींपैकी एक होता. मी त्यांचा साथीदार श्रीमान कूट्स यांना भेटलो, ते व्यक्ती पूर्वी लाकडाच्या वखारीत काम करायचे, ते लाकडे विकायचे आणि सुमारे एक वर्षापूर्वी, आणि श्रीमान कूट्स हे माझे खूप चांगले मित्र आहेत, आणि फर्स्ट बॅप्टिस्ट चर्चमधील डिकन आहेत, आणि तो म्हणाला, "बिली, तू खरा शक्तिशाली मनुष्य असायला हवा."

आणि मी म्हणालो, "नाही, मी नाही, श्रीमान कूट्स."

31 तो म्हणाला, “तू तुझ्या बाबांच्या मागे लागलास, तर तू होशील.” म्हटले, “एकशे चाळीस पौंड वजनाचा, मी त्या मनुष्याला पाहिले आहे, तो एकटा गाडीवर एक ओंडका टाकीत असे, ज्याचे वजन नऊशे पौंड होते.” त्याला ते कसे करायचे हे पक्के माहित होते. तो मजबूत होता. जेव्हा आई त्यांना हाक मारी, तेव्हा मी त्यांना हात पाय धुताना आणि रात्रीच्या जेवणासाठी तयार होऊन येताना पाही.

32 आणि आमच्या समोरच्या अंगणात एक जुने सफरचंदाचे झाड होते, आणि मग मागच्या बाजूने तीन–चार लहान झाडे होती. आणि मधल्या झाडावर एक जुना, तुटलेला, मोठा आरसा होता. आणि झाडाच्या कडेला काही खिळे वाकवून बसविलेला होता. तुमच्यापैकी काही सुतार जे ऐकत असतील ते त्याला म्हणायचे “कोट हँगर्स.” काच त्याच्या जागी ठेवण्यासाठी ती वाकविलेली होती. आणि तेथे एक जुना कथील कंगवा होता. किती जणांनी पाहिला आहे जुना कथील…जुन्या पद्धतीचा कथील कंगवा? मी तो आता पाहू शकतो.

33 आणि मग एक छोटासे हातपाय धुण्याचे पात्र होते, खाली थोडा तिरका पाय असलेला एक छोटासा फलक, झाडाला लावलेला. एक छोटासा, जुना, अर्धा सल्फर पंप होता ज्याने आम्ही पाणी बाहेर काढायचो आणि आम्ही या जुन्या झाडावर धुवायचो. आणि आई धान्याची पोती घेऊन टॉवेल बनवत असे. कोणी कधी धान्याच्या–पोत्याचे टॉवेल वापरले आहेत का? बरं, मला खात्री आहे की मला आता घरी असल्यासारखे वाटत आहे. आणि ते मोठे, जुने खरबरीत टॉवेल! आणि जेव्हा ती आम्हाला लहान मुलांना आंघोळ घालायची तिला…प्रत्येक वेळी ती घासताना ती चामडी घासत होती असे वाटत असे. आणि मला ती जुनी धान्याची गोण आठवते. आणि ती सजवण्यासाठी, काही दोऱ्या बाहेर काढी, लहान गोंडे बनवीत असे.

34 पेंढ्याच्या उशीवर किती जण झोपले आहेत? बरं, मी—म्हणेन! पेंढयाची उशी म्हणजे काय हे किती जणांना माहीत आहे? बरं, बंधू ग्लोव्हर, मी आता घरी आहे, नक्कीच! पेंढयाची उशी, बरं, मी ती वापरलेल्या ला अधिक समय झालेला नाही, आणि तो होता…अरे, ते—त्याने छान झोप येते, मस्त. मग हिवाळ्यात ते जुन्या पंखांचा गादी घालीत असत आणि त्यावर झोपत असत, तुम्हाला माहिती आहे, आणि नंतर तागाची चादर आमच्या अंगावर घेत असू कारण बर्फ घरातील त्या—त्या—त्या भेगामध्ये जात असे, तुम्हाला माहीत आहे, जुन्या लाकडांमध्ये हवा जात असे, तुम्हाला माहीत आहे, आणि त्या मधून थंड हवा जात असे. आणि, अरे, मला ते चांगले आठवते.

35 आणि मग वडिलांकडे दाढी करण्याचा ब्रश असायचा. मी…आता मी तुम्हाला सांगतो तो कसा होता. हे मक्याच्या टरफलापासून बनवलेला होता, मक्याच्या टरफलापासून शेव्हिंग ब्रश. त्याने आईचा जुना साबण जो तिने बनवला होता, तो घ्यायचा आणि या मक्याच्या टरफलाच्या ब्रशने तो त्याच्या चेहऱ्यावर लावायचा, आणि मोठ्या, जुन्या सरळ रेझरने दाढी करीत असे. आणि रविवारी तो काही—काही कागदाचे तुकडे घेई, त्याच्या गळ्याभोवती चिकटवीत असे, त्या सेल्लयुलॉइडच्या कॉलर होत्या आणि ते गळ्या भोवती अशा प्रकारे ठेवत तो—तो—तो साबणाचा फेस त्याच्या शर्टच्या कॉलरवर येऊ नये म्हणून. असे केलेले तुम्ही कधी पाहिले आहे का? का, खरंच, खरंच!

36 मला खाली असलेला एक जुना झरा आठवतो, जिथे आम्ही पाणी प्यायला जायचो, आणि जुन्या भोपळ्याच्या डावने आम्ही पाणी काढत असू. किती जणांनी कधी भोपळ्याचा डाव पाहिला आहे? बरं, तुमच्यापैकी किती जण केंटकीचे आहेत, कसेही? होय, बरं, या केंटकिवासियाकडे पहा. बरं, माझे, मी—माझ्या अगदी घरीच आहे…मला वाटले की

येथे सर्व ओकी आणि आर्की आहेत, परंतु सर्व केंटकीच येत आहेत असे दिसते. बरं, तुम्हाला माहिती आहे, त्यांनी काही महिन्यांपूर्वी केंटकीमध्ये तेलाचा संप केला होता, त्यामुळे कदाचित त्यांच्यापैकी काही ह्या मार्गाने येत असतील.

37 आणि मग मला आठवते जेव्हा बाबा आत यायचे आणि रात्रीच्या जेवणासाठी हातपाय धूत असत, ते त्याच्या शर्टच्या बाह्या गुंडाळीत असत, आणि ते लहान आखूड जाड हात. आणि जेव्हा ते त्यांचे हात धुण्यासाठी शर्टचे हात वर खेचत, पाणी त्याच्या चेहऱ्यावर फेकत, तेव्हा ते पीळदार स्नायू त्याच्या हातांमध्ये दिसत असत. आणि मी म्हणायचो, "तुला माहीत आहे, माझे बाबा दीडशे वर्ष जगतील." इतके ते मजबूत होते! पण बावन्नव्या वर्षी त्यांचा मृत्यू झाला. पहा? "येथे आमच्याकडे कोणतेही कायम शहर नाही." ते बरोबर आहे. आपण कायम राहू शकत नाही.

38 आता आपण सर्वजण, एक छोटीशी सहल करू या. इथे तुमच्यापैकी प्रत्येकाची जीवनकथा आहे, तशीच माझीही आहे, आणि आठवणींच्या रस्त्यावर कधीतरी फिरणे चांगले आहे. असं तुम्हाला वाटत नाही का? फक्त मागे जा, आणि आपण सर्वजण थोड्या काळासाठी परत जाऊ या, लहान मुलांप्रमाणेच त्याच अनुभवांकडे परत जाऊ या.

39 आणि आता जीवनकथेचा पहिला भाग. मी ह्याविषयी थोडेसे सांगेन, कारण ते पुस्तकात आहे आणि तुमच्यापैकी अनेकांकडे ते पुस्तक आहे.

40 माझा जन्म केंटकीच्या पर्वतरांगांमध्ये, एका लहानशा पर्वतावरील खोलीत झाला. त्यांची एक खोली होती ज्यात आम्ही राहत होतो, जमिनीवर गालिचा नव्हता, जमिनीवर लाकूडही नव्हते, ती फक्त एक उघडी जमीन होती. आणि एक झाडाच्या खोडाचा बुंधा, तीन कापलेल्या पायावर झाडाच्या खोडाचा बुंधा, ते आमचे टेबल होते. आणि ते सर्व लहान ब्रॅन्हम इकडे तिकडे, आणि छोट्या जुन्या खोलीच्या समोर, आणि तेथे रेंगाळत असत, तुम्हाला माहीत आहे, ती सर्व लहान भावंड अशी दिसतात जणूकाही, धुळीत ओपोसमचा एक समुह चिखलात लोळत आहेत. आम्ही नऊ जण, आणि एक लहान बहीण होती, आणि त्या मुलांमध्ये तिचा काळ खूप कठीण होता. त्या काळात आपण केलेल्या गोष्टींवरून आजही तिचा आदर केला पाहिजे. ती आमच्याबरोबर कुठेही जाऊ शकत नव्हती, आम्ही तिला मागे ठेऊन पळवत असू, ती एक मुलगी होती. म्हणून ती घेऊ शकली नाही, तुम्हाला माहिती आहे. तर आमच्याकडे होते...आणि सर्व...

41 मला आठवते टेबलच्या मागे आमच्याकडे फक्त दोन खुर्च्या होत्या, आणि त्या फांदीच्या सालापासून बनवलेल्या होत्या. फक्त जुनी हिकोरी रोपटे एकत्र ठेवली, आणि त्यांच्या तळाशी हिकॉरी झाडाची साल लावली. हिकॉरी बार्क चेअर कधी कोणी पाहिली आहे का? होय. आणि मला अजूनही आईचा शब्द ऐकू येतोय. आणि, नंतर जेव्हा आम्ही अशा ठिकाणी पोहोचलो जिथे तिच्याकडे लाकडी फरशी होती, जेथे त्या बाळांना तिच्या मांडीवर *अशा* प्रकारे ठेवी, आणि त्या जुन्या खुर्चीला हलविताना फक्त दणदणाट, धमाकेदार, जमिनीवर मोठा आवाज होत असे. आणि मला आठवते की लहान मुलांना दाराबाहेर जाण्यापासून अडवीत असे, जेव्हा ती धुणी करीत असेल किंवा काहीतरी, ती एक खुर्ची खाली ठेवीत असे आणि ती दाराच्या पलीकडे वळवायची, जेव्हा तिला पाणी आणण्यासाठी झऱ्यावर जावे लागत असे तेव्हा लहान मुलांना बाहेर पडण्यापासून रोखण्यासाठी, इत्यादी.

42 आणि माझा जन्म झाला तेव्हा आई पंधरा वर्षांची होती, बाबा अठरा वर्षांचे होते. आणि मी नऊ मुलांपैकी प्रथम होतो. आणि त्यांनी मला सांगितले की माझा जन्म झाला त्या दिवशी सकाळी...

43 आता, आम्ही खूप गरीब होतो, अगदी गरीबातील गरीब होतो. आणि आमच्या या छोट्या खोलीमध्ये एकही खिडकी नव्हती. त्यास एक लाकडी दरवाजासारखे होते जो तुम्ही उघडू शकता. मला शंका आहे की आपण असे काही पाहिले असेल. खिडकीऐवजी उघडलेला छोटासा लाकडी दरवाजा, तुम्ही तो दिवसा उघडा ठेवता आणि रात्री बंद करता. त्या दिवसात आम्ही विजेचे दिवे लावू शकत नव्हतो किंवा रॉकेलही पेटवू शकत नव्हतो, आमच्याकडे तुम्ही काय म्हणता "एक ग्रीसचा दिवा होता." आता, ग्रीसचा दिवा म्हणजे काय हे तुम्हाला कधी माहीत आहे की नाही हे मला माहीत नाही. बरं, तुम्ही काय करता…आणि तुम्ही कधी खरेदी केली आहे का…देवदारु झाडाचे लाकूड जाळले आहे का? फक्त एक देवदारुचे लाकूड घ्या आणि ते पेटवा आणि झाकणावर ठेवा, ते जळू लागेल. आणि त्यामुळे…थोडासा धूर होत असे, परंतु त्यांच्याकडे फर्निचर नव्हते, तसेही, धूर साचण्यासाठी. तर ते फक्त…त्या खोलीत धूर होत असे. तेथे धूर खूप निघत असे कारण तो तेथून काढण्यासाठी तेथे छप्पर होते, म्हणून ते…

44 आणि माझा जन्म एप्रिलच्या—च्या 6, 1909 रोजी झाला. अर्थातच, तुम्हाला माहिती आहे, त्यामुळे मी आता पंचवीसपेक्षा थोडा जास्त झालो आहे. आणि म्हणून, ज्या दिवशी माझा जन्म झाला, आई म्हणाली की त्यांनी ती खिडकी उघडली. आता, आमच्याकडे डॉक्टर नव्हते, तेथे एक दाई होती. फक्त…आणि ती दाई माझी आजी होती. आणि म्हणून जेव्हा माझा जन्म झाला आणि माझी रडण्याची पहिली सुरुवात, आणि—आणि आईला तिच्या मुलाला पाहायचे होते. आणि—आणि ती स्वतः एक लहान मूलापेक्षा अधिक नव्हती. आणि जेव्हा त्यांनी ती लहानशी खिडकी उघडली, अगदी दिवसाच्या सुरुवातीला, सुमारे पाच वाजता. आणि ते…एका लहानशा झुडपाच्या बाजूला एक रॉबिन पक्षी बसला होता. जसे तुम्ही सर्वांनी त्याचे ते फोटो माझ्या जीवनकथेच्या पुस्तकामध्ये—मध्ये पाहिलेले आहे. एक रॉबिन पक्षी त्याच्यातल्या सगळ्या गोष्टीं गात तिथे बसला होता.

45 मला नेहमीच रॉबिन पक्षी आवडतात. आता, रेडिओ भूमीवर असलेल्या मुलांनो, माझ्या पक्ष्यांना गोळी मारू नका. तुम्ही पहा, ते आहेत—ते आहेत—ते आहेत…ते माझे पक्षी आहेत. तुम्ही कधी रॉबिनची आख्यायिका ऐकली आहे का, त्याची छाती लाल कशामुळे झाली? मी इथेच एका क्षणासाठी थांबतो. त्याला त्याची लाल छाती कशी प्राप्त झाली…तेथे राजांचा राजा एके दिवशी वधस्तंभावर मरत होता, आणि तो दु:ख भोगीत होता आणि कोणीही त्याच्याकडे येऊ शकत नव्हते. त्याला मदत करायला कोणीच नव्हते. आणि एक लहान तपकिरी पक्षी त्या वधस्तंभामधून खिळे काढू इच्छित होता, आणि तो वधस्तंभावर उडत राहिला आणि त्या खिळयांना ओढीत होता. त्यांना बाहेर काढण्यासाठी तो खूपच लहान होता आणि त्याचे लहान छाती रक्ताने लाल झाली होती. आणि तेव्हापासून त्याची छाती लाल झाली आहे. त्याला गोळी मारू नका, मुलांनो. त्याला एकटे सोडा.

46 तो खिडकीच्या बाजूला बसला होता, रॉबिन्स गाताना चिवचिवाट करतात. आणि—आणि बाबांनी खिडकी मागे ढकलली. आणि जेव्हा त्यांनी खिडकीचा छोटा दरवाजा मागे ढकलला, तुम्ही चित्रात जो प्रकाश पाहता तो खिडकीतून फिरत आला, माझी आई म्हणते, आणि पलंगावर स्थिर झाला. आजीला काय बोलावे सुचत नव्हते.

47 आता, आम्ही…एक धार्मिक कुटुंब नव्हतो. माझे लोक कॅथलिक आहेत. मी दोन्ही बाजूंनी आयरिश आहे. माझे वडील कट्टर आयरिश आहेत, ब्रॅन्हम. माझी आई हार्वे आहे; फक्त, तिच्या वडिलांनी एका चेरोकी इंडियनशी लग्न केले, त्यामुळे आयरिशच्या रक्ताची छोटीशी वंशावळी तुटली. आणि वडील आणि आई चर्चमध्ये गेले नाहीत, आणि त्यांनी

चर्चच्या बाहेर लग्न केले आणि त्यांचा कोणताही धर्म नव्हता. आणि परत तिथे डोंगरावर कॅथलिक चर्च देखील नव्हते. म्हणून ते सुरुवातीच्या स्थायिकांमध्ये येतात, दोन ब्रॅन्हम एकत्र आले, आणि त्यातून ब्रॅन्हमची संपूर्ण पिढी उगवली; ही कुटुंबाची वंशावळी आहे.

48 आणि मग तिने उघडली...जेव्हा त्यांनी ही खिडकी उघडली आणि हा प्रकाश तिथे उभा राहिला, तेव्हा त्यांना काय करावे हे सुचले नाही. या कार्यक्रमासाठी वडिलांनी त्याला (आई म्हणाली) एक नवीन जोडी विकत घेतली होती. ते त्या...त्याचे हात ओवरकोटच्या लाळेऱ्यात ठेवून उभे होते, ज्या प्रमाणे त्या काळात जंगलतोड आणि वृक्षतोड करणारे करीत असत. आणि त्यामुळे ते घाबरले.

49 बरं, मी मोठा झाल्यावर कदाचित दहा दिवसांचा, किंवा काहीतरी, त्यांनी मला एका छोट्या बाप्टिस्ट चर्चमध्ये नेले "ओपोसम किंगडम," ओपोसम किंगडम बॅप्टिस्ट चर्च. ते एक नाव आहे. तेथे एक जुना सर्किट प्रचारक येत होता, हा जुन्या विचारांचा बाप्टिस्ट प्रचारक दर दोन महिन्यांनी एकदा तेथे येत असे. चालू...लोकांची एकत्र लहानशी सभा होत असे, ते काही गाणी गात, पण ते उपदेश सर्किट रायडरवर क्वचितच प्रचार करत होते. ते त्याला दरवर्षी भोपळ्याची पोती आणि अशा काही गोष्टी देत, तुम्हाला माहीत आहे, लोक ते देण्यासाठी जमा करत असत. आणि म्हातारा प्रचारक आला होता, आणि तिथे त्याने माझ्यासाठी एक बालक म्हणून प्रार्थना केली. माझी चर्चची ती पहिलीच फेरी होती.

50 वयाच्या सुमारे...दोन वर्षांपेक्षा अधिक काळानंतर, पहिला दृष्टान्त झाला.

51 बरं, त्यांनी सांगितले होते की तिथल्या डोंगरात आजूबाजूला हा प्रकाश आला. म्हणून त्यांनी ते शोधण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यापैकी काहींनी सांगितले की हा सूर्यप्रकाश घरातील आरशावर परावर्तित होत असावा. पण तिथे आरसा नव्हता. आणि सूर्य उगवला नव्हता, म्हणून ती खूप पहाट होती, पाच वाजता. आणि मग, अरे, ते त्यांनी बाजूला सारून दिले. आणि जेव्हा मी सुमारे...समजा तीन वर्षांचा होतो...

52 आता, मी प्रामाणिक असणे आवश्यक आहे. येथे अशा काही गोष्टी आहेत ज्या मला सांगायला आवडत नाहीत, आणि माझी इच्छा आहे की मी त्या टाळाव्या आणि त्या सांगू नयेत. परंतु तरीही, सत्य सांगण्यासाठी, आपण सत्य सांगणे आवश्यक आहे जर ते आपल्याविषयी किंवा आपल्या लोकांविषयी असेल. त्याबद्दल प्रामाणिक रहा, आणि मग ते नेहमी सारखेच असते.

53 माझे वडील एक धार्मिक व्यक्ती असण्यापासून फार दूर होते. तो एक सामान्य पर्वतीय मुलगा होता जो सतत, मद्यपान करीत असे. आणि तो काही अडचणीत सापडला होता झुंज होताना, आणि झुंज होताना दोन किंवा तीन माणसे जवळजवळ मारली गेली होती, डोंगरावर एक प्रकारे मेजवानी करताना, गोळीबार, आणि चाकूने एकमेकांना कापीत होते. आणि बाबा या झुंजीचे प्रमुख पुढारी होते, कारण तेथे त्याच्या एका मित्राला दुखापत झाली होती, आणि कोणी तरी एका खुर्चीने मारले होते. आणि तेथे...त्या मनुष्याकडे चाकू होता आणि तो वडिलांच्या मित्राला कापायला निघाला होता आणि वडिलांनी त्यात त्याचा सहभाग घेतला होता, त्याच्या छातीतून, या चाकूने जमिनीवर. आणि ही खरोखरच एक भयानक मारामारी झाली असावी, कारण त्यांनी, बर्कसविलेपर्यंत, बऱ्याच मैलांच्या अंतरावर, त्यांनी वडिलांच्या मागे, घोडयाच्या पाठीवर, एक शेरीफ पाठवला.

54 त्यामुळे तो मनुष्य मृत्यूमुखी अवस्थेत पडला होता. कदाचित त्याचे काही लोक ऐकत ही असतील. मी त्याचे नाव सांगणार आहे, विल यारब्रो हे त्याचे नाव होते. ते बहुधा...मला वाटते की त्याच्या मुलांपैकी, त्यांच्यापैकी काही कॅलिफोर्नियामध्ये आहेत. पण तो एक दादागिरी करणारा, महान सामर्थ्यवान मनुष्य होता, त्याने स्वतःच्या मुलाला कुंपणाच्या

दांडयाने मारले होते. त्यामुळे तो—तो खूप शक्तिशाली आणि दुष्ट मनुष्य होता. आणि त्यामुळे त्याची आणि बाबांमध्ये चाकूची मोठी झुंज झाली होती. आणि माझ्या वडिलांनी त्या मनुष्याला जवळजवळ मारले होते, म्हणून त्याला केंटकी सोडून पळून जावे लागले आणि नदी ओलांडून इंडियानाला यावे लागले.

55 आणि त्याला एक भाऊ होता, जो त्यावेळी लुईव्हिल, केंटकी येथे राहत होता, लुईव्हिल मधील, केंटकी येथील वुड मोझॅक सॉ मिल्सचा सहाय्यक अधीक्षक होता. आणि म्हणून बाबा आपल्या मोठ्या भावाला शोधायला आले. बाबा सतरा मुलांपैकी, सगळ्यात धाकटे होते. आणि म्हणून तो त्याच्या मोठ्या भावाला शोधण्यासाठी आला, आणि तो जवळजवळ एक वर्षासाठी निघून गेला होता. तो परत येऊ शकला नाही, कारण कायदा त्याचा शोध घेत होता. आणि मग जेव्हा आम्ही त्याच्याकडून, दुसऱ्या नावाने स्वाक्षरी केलेले पत्र ऐकले, पण त्याने आईला सांगितले होते की तिने त्याच्याकडून कसे ऐकले असेल.

56 आणि मग मला आठवतं की एके दिवशी तो झरा (ही लहान खोली) घराच्या अगदी मागे होता. आणि—आणि नंतर त्या काळात...ते नऊ आहेत...माझ्यात आणि माझ्या मागच्या भावात अकरा महिन्यांचा फरक आहे, आणि तो अजूनही रांगत होता. आणि माझ्या हातात एक मोठा खडक होता, आणि मी त्याला दाखवण्याचा प्रयत्न करत होतो की हा खडक मी त्या खोल चिखलात किती मेहनतीने फेकू शकतो, जिथे हा झरा जमिनीखालून वाहत होता आणि जमीन चिखलमय झाली होती. आणि मी एक पक्षी ऐकला, आणि तो झाडावर गात होता. आणि मी त्या झाडाकडे पाहिलं आणि तो पक्षी उडून गेला, आणि, जेव्हा तो गेला, तेव्हा एक वाणी माझ्याशी बोलली.

57 आता, मला माहित आहे की तुम्हाला वाटते की मी विचार करू शकत नाही आणि ते लक्षात ठेवू शकत नाही. परंतु परमेश्वर देव जो न्यायाधीश आहे, पृथ्वी आणि आकाश आणि सर्व काही आहे, त्याला माहित आहे की मी खरे बोलत आहे.

58 तो पक्षी, जेव्हा उडून गेला, जेथे पक्षी झाडावर होता तिथून एक वाणी आली, जणूकाही वारा झुडुपात अडकला, आणि ती म्हणाली, "तु न्यू अल्बानी नावाच्या शहराजवळ राहशील." आणि मी तीन वर्षांचा होतो तेव्हापासून आजपर्यंत न्यू अल्बानी, इंडियानाच्या तीन मैलांच्या आत राहत आहे.

59 मी आत जाऊन आईला याबद्दल सांगितले. बरं, तिला वाटलं मी फक्त स्वप्न पाहत आहे किंवा काहीतरी.

60 नंतर आम्ही इंडियानाला राहायला गेलो आणि वडील श्रीमान वाथेन या श्रीमंत माणसाकडे, कामाला गेले. ते वाथेन डिस्टिलरीजचे मालक आहेत. आणि त्याच्याकडे मोठ्या प्रमाणात शेअर्स होते; तो एक करोडपती आहे, आणि लुईव्हिल कर्नल, आणि—आणि बेसबॉल, आणि पुढे. आणि मग आम्ही तिथे जवळच राहायचो. आणि बाबा गरीब असूनही, दारू पिल्याशिवाय चालत नव्हते, म्हणून तो—तो एका—एका दारू गाळण्याच्या भट्टीमध्ये व्हिस्की बनवायला गेला.

61 आणि मग त्यामुळे माझ्यावर भार आला कारण मी मुलांमध्ये सर्वात मोठा होतो. व्हिस्की बनवताना त्या कॉइल्स थंड ठेवण्यासाठी, मला या भट्टीकडे पाणी भरून ठेवावे लागे. मग त्याला ती विकावी लागे आणि मग त्याच्याकडे अशा दोन किंवा तीन भट्टया होत्या. आता, हा भाग आहे जो मला सांगायला आवडत नाही, परंतु ते सत्य आहे.

62 आणि मला आठवते की एके दिवशी, कोठारातून, रडत रडत घराकडे आलो. कारण त्या जागेच्या मागच्या बाजूला एक तलाव होता...जिथे ते बर्फ फोडायचे. तुमच्यापैकी

बऱ्याच जणांना आठवत असेल जेव्हा ते बर्फ कापून भुश्यात टाकीत असत. बरं, मिस्टर वॅथेनने देशात बर्फ अशा प्रकारे ठेवला. आणि वडील त्याच्यासाठी एक—एक चालक, एक खाजगी चालक होते. आणि जेव्हा हा...हा तलाव माशांनी भरलेला होता आणि जेव्हा ते बर्फ कापायला जायचे आणि तो आत आणून भुसामध्ये टाकीत, मग उन्हाळ्यात तो बर्फ वितळला जेव्हा तो खाली गेला, मला वाटते की तो सरोवराच्या बर्फासारखा स्वच्छ होता, आणि तो ते पिण्यासाठी नव्हे, तर पाणी थंड ठेवण्यासाठी वापरत असत, ते त्यांच्या बादल्या आणि त्यांच्या दुधाभोवती ठेवीत आणि अशा प्रकारे.

63 आणि एके दिवशी या पंपावर मागच्या बाजूने पाणी भरत होते, जे शहराच्या जवळपास होते. मी ओरडत होतो कोण कधी किंचाळीत नाही, कारण मी शाळेतून आलो होतो आणि सगळी मुलं तलावात मासेमारी करायला गेली होती. मला मासेमारी करायला खूप आवडायचे. आणि म्हणून ते सर्व माझ्याशिवाय मासेमारीला गेले, आणि मला या भट्टीसाठी पाणी भरावे लागत होते. अर्थात, काय सांगू, गप्प राहावे लागत होते, तेथे मनाई होती. आणि मी...असा त्रास होता. आणि मला आठवते की पायाच्या बोटाला इजा झाली असता आलो होतो, आणि माझ्या पायाचे बोट धुळीपासून दूर ठेवण्यासाठी मी माझ्या पायाच्या खाली कणसाचा वाटोळा लगदा गुंडाळला होता. तुम्ही असे कधी केले आहे का? *अशा* प्रकारे तुमच्या पायाच्या बोटाखाली कणसाचा वाटोळा लगदा ठेवा आणि त्याभोवती एक दोरी गुंडाळा. ते तुमच्या पायाचे बोट जवळजवळ कासवाच्या डोक्यासारखे वर धरते, तुम्हाला माहिती आहे, वर चिकटून ठेवते. माझ्या पायाच्या बोटाखाली या कणसाचा वाटोळा लगदासह मी जिथे गेलो तिथे तुम्ही माझा मागोवा घेऊ शकता; मी ते कुठे ठेवले, तुम्हाला माहिती आहे. माझ्याकडे घालायला बूट नव्हते. त्यामुळे आम्ही कधी बूट घातले नाही, कधीकधी अर्धा हिवाळा संपेपर्यंत. आम्ही केले तर, आम्ही...आम्हाला कोणी देत, त्यांतून केवळ निवडत होतो. आणि कपडे जे कोणी, संस्था आम्हाला देत असत.

64 आणि मी या झाडाखाली थांबलो, आणि मी तिथे बसलो होतो तेथे वावटळ आली (ते सप्टेंबरमध्ये होते) कारण मला मासेमारीला जायचे होते, मला पाण्याचे अनेक गंगाळ छोट्या काकवीच्या बादल्यांसह बांधायचे होते, जेमतेम *तेवढे* उंच, अर्धा गॅलन, कारण मी फक्त सात वर्षांचा लहान मुलगा होतो. आणि मी ते एका मोठ्या टबमध्ये ओतले आणि नंतर परत गेलो आणि आणखी दोन बादल्या, काढून आणल्या आणि परत आलो. तेच पाणी आमच्याकडे होते. आणि घरात, ही माणसे डॅडीसोबत, त्या रात्री कॉर्न व्हिस्कीची एक तुकडी बनविणार होते.

65 आणि मी रडत होतो, आणि लगेचच मला काहीतरी वावटळीसारखा आवाज ऐकू आला, असे काहीतरी (आता, मला आशा आहे की ते खूप जोरात नाही), जात आहे "हूऊश्श, हूऊश्श," फक्त असा आवाज. बरं, ती भयंकर शांतता होती, आणि मी आजूबाजूला पाहिले. आणि तुम्हाला माहीत आहे काय, छोटीशी वावटळ, मला विश्वास आहे की तुम्ही त्यांना लहान चक्रीवादळे म्हणता? वर्षाच्या शरद ऋतूमध्ये ते मक्याच्या शेतातून येत असतात, तुम्हाला माहिती आहे, पाने आणि पुढे, तिथल्या शरद ऋतूत, पाने नुकतीच वळायला लागली होती. आणि मी एका मोठ्या पांढऱ्या चिनाराच्या झाडाखाली, धान्याचे कोठार आणि ते—ते घर यांच्यामध्ये उभा होतो. आणि मी तो आवाज ऐकला. आणि मी आजूबाजूला पाहिलं, तेथे ह्या खोलीइतकीच शांतता होती. कोठेही पान हलत नव्हते, किंवा काहीही नाही. आणि मला वाटलं, "तो आवाज कुठून येतोय?" बरं, मला वाटलं, "येथून दूर गेलेच पाहिजे." कारण मी फक्त एक मुलगा होतो. आणि तो आवाज आणखी जोरात होत गेला.

66 मी माझ्या लहान बादल्या उचलल्या आणि आणखी एक दोन वेळा किंचाळलो आणि जायला सुरुवात केली, मी विश्रांती घेत होतो. आणि या मोठ्या झाडाच्या फांद्याखाली, मी फक्त काही फुटांवर आलो, आणि, अरे, बापरे, तो एक वावटळीसारखा आवाज आला. आणि मी वळून पाहिलं, आणि अर्ध्या वाटेवर त्या झाडाच्या वर आणखी एक वावटळ होती, त्या झाडा अवती भवती फिरत होती, ती पाने हलवत होती. बरं, मला त्याबद्दल काही चमत्कारिक वाटलं नाही कारण ते फक्त वर्षाच्या त्या काळात आणि शरद ऋतूतच असते, का, ती वावटळ येतात. थोडे...आम्ही त्यांना "वावटळ" म्हणतो. आणि ते—आणि ते धूळ उडवतात. तुम्ही त्यांना वाळवंटात असे पाहिले आहे. तीच गोष्ट. म्हणून मी पाहिलं, पण ते दूर जात नव्हते. सामान्यत: ते फक्त क्षणभर एका बाहेर सोडलेल्या श्वासासारखे असते, नंतर ते निघून जाते, परंतु ते तेथे दोन मिनिटे किंवा त्याहून अधिक वेळ होते.

67 बरं, मी पुन्हा जाण्यास सुरूवात केली. आणि मी पुन्हा ह्याकडे बघण्यास वळलो. आणि जेव्हा असे केले, तेव्हा माझ्यासारखाच ऐकू येणारा मानवी आवाज, बोलला, "तु कधीही मद्यपान करू नको, धुम्रपान करू नको, किंवा कोणत्याही प्रकारे तुझे शरीर अशुद्ध करू नको. तु मोठा झाल्यावर तुझ्यासाठी एक काम असेल." का, त्यामुळे मला मरणाची भीती वाटली! एका छोट्या मुलाला कसे वाटले असेल याची तुम्ही कल्पना करू शकता. मी त्या बादल्या टाकल्या, आणि मी मोठ्या आवाजाने किंचाळत, मी जमेल तितक्याच लवकर घरी गेलो.

68 आणि त्या देशात विषारी साप होते, साप होते, आणि ते खूप विषारी आहेत. आईला वाटलं, बागेच्या बाजूने येताना कदाचित माझा पाय विषारी सापाच्या डोक्यावर पडला असेल आणि ती मला भेटायला धावली. आणि मी तिच्या मिठीत उडी मारली, किंचाळत, तिला मिठी मारली आणि तिचे चुंबन घेतले. आणि तिने म्हटले, "काय समस्या आहे, तुला सर्पदंश झाला का?" मला सर्वत्र पाहिले.

मी बोललो, "नाही, ममा! त्या झाडावर खाली एक मनुष्य आहे."

69 आणि ती म्हणाली, "अरे, बिली, बिली! काहीतरी काय?" आणि ती म्हणाली, "तू थांबशील का आणि झोपायला जाशील का?"

70 मी बोललो, "नाही, मम! त्या झाडावर एक मनुष्य आहे, आणि त्याने मला मद्यपान करू नको आणि धूम्रपान करू नको असे सांगितले."

71 "व्हिस्की प्या आणि—आणि गोष्टी." आणि मी त्याच वेळी, एका मूनशाईन दारू गाळण्याच्या भट्टीत पाणी भरत होतो. आणि तो म्हणाला, "तु कधीही मद्यपान करू नको किंवा कोणत्याही प्रकारे तुझे शरीर अशुद्ध करू नको." ते अनैतिक आहे, तुम्हाला माहिती आहे, आणि माझ्या मुला...तरुण पुरुष स्त्रियांसह. आणि माझ्या चांगल्यासाठी, मी कधीच अशा गोष्टींसाठी दोषी ठरलो नाही. परमेश्वराने मला त्या गोष्टींमध्ये मदत केली, आणि मी पुढे जात असताना तुम्हाला कळेल. मग त्यानंतर, "मद्यपान करू नको किंवा धुम्रपान करू नको, किंवा तुझे शरीर अशुद्ध करू नको, कारण तु मोठा झाल्यावर तुझ्यासाठी एक काम असेल."

72 बरं, मी ते आईला सांगितले, आणि—आणि ती फक्त माझ्यावर हसली. आणि मी फक्त पाहत होतो. तिने डॉक्टरांना बोलावले, आणि डॉक्टर म्हणाले, "बरं, तो फक्त घाबरलेला आहे, एवढेच." म्हणून तिने मला झोपवले. आणि त्या दिवसापासून आजपर्यंत, मी कधीही त्या झाडाजवळून गेलो नाही. मी घाबरलो होतो. मी बागेच्या दुसऱ्या बाजूने खाली जात असे, कारण मला वाटले की त्या झाडावर एक मनुष्य आहे आणि तो माझ्याशी बोलत होता, खूप खोल आवाजात तो बोलला.

73 आणि त्यानंतर सुमारे एक महिन्यानंतर कधीतरी, मी माझ्या लहान भावांसोबत, समोरच्या अंगणात, गोट्या खेळत होतो. आणि एकाच वेळी मला एक विचित्र अनुभव आला. आणि मी थांबलो आणि एका झाडाच्या बाजूला बसलो. आणि आम्ही अगदी ओहायो नदीच्या काठावर आलो होतो. आणि मी जेफरसनव्हिलच्या दिशेने खाली पाहिले, आणि मी एक पूल वर उठून नदीच्या पलीकडे, जाताना पाहिला. आणि मी सोळा माणसे पाहिली (मी त्यांना मोजले) जे तेथून खाली पडले आणि त्या पुलावर त्यांचे जीव गमावले. मी पटकन धावत जाऊन आईला सांगितले, आणि तिला वाटले की मी झोपायला गेलोय. पण त्यांनी ते लक्षात ठेवले, आणि त्यानंतर बावीस वर्षांनी तो म्युनिसिपल ब्रिज आता (जो तुमच्यापैकी बरेच जण ओलांडतात जेव्हा तुम्ही तेथे जाता) त्याच ठिकाणी नदी ओलांडते, आणि नदी ओलांडण्यासाठी पूल बांधताना सोळा जणांनी आपले प्राण गमावले.

74 ते पूर्णपणे सत्य होण्यात कधीही अपयशी ठरले नाही. जसे तुम्ही ते येथे सभागृहात पाहता, हे सर्व समयी असेच होते.

75 आता, त्यांना वाटले की मी फक्त घाबरलेलो होतो. जे, मी एक घाबरणारा व्यक्ती आहे, हे खरे आहे. आणि, आपण कधीही निरीक्षण केले तर, लोक जे—जे अध्यात्मिक होण्यास प्रवृत्त असतात ते भिणारे असतात.

76 कवी आणि संदेष्टे याकडे पहा. आणि ते प्रसिद्ध गाणे लिहिणाऱ्या विल्यम काउपरकडे पहा, “इमॅन्युएलच्या नसांमधून काढलेला रक्ताने भरलेला झरा आहे.” आपण कधी... तुम्हाला हे गाणे माहित आहे. फार काळ झाला नाही मी त्याच्या कबरेपाशी उभा होतो. भाऊ ज्युलियस, माझा विश्वास आहे, मला माहित नाही, नाही...होय, ते बरोबर आहे, त्याच्या थडग्यावर तो आमच्यासोबत होता. आणि—आणि तेथे, त्याने ते गाणे लिहिल्यानंतर, प्रेरणा त्याला सोडून गेली, त्याने आत्महत्या करण्यासाठी ती—ती नदी शोधण्याचा प्रयत्न केला. पाहा, आत्मा त्याला सोडून गेला होता. आणि कवी आणि लेखक या सारखी लोकं आणि...किंवा नाही...म्हणजे संदेष्टे.

77 एलीयाकडे पहा, जेव्हा तो डोंगरावर उभा राहिला आणि त्याने स्वर्गातून अग्नी बोलावला आणि आकाशातून पाऊस बोलावला. मग जेव्हा आत्मा त्याला सोडून गेला, तेव्हा तो एका स्त्रीच्या धमकीने पळाला. आणि चाळीस दिवसांनंतर, देवाला तो गुहेत लपलेला आढळला.

78 योनाकडे पहा, पुरेश्या अभिषेकाने भरलेला जेव्हा प्रभूने त्याला निनवे येथे प्रचार करण्यासाठी अभिषेक केला होता, जो पर्यंत एक—एक शहर जे सेंट लुईसच्या आकाराचे होते गोणताटाचे वस्त्र नेसून पश्चाताप केला. आणि मग जेव्हा आत्मा त्याला सोडून गेला, तेव्हा त्याचे काय झाले? आत्म्याने त्याला सोडल्यानंतर आपण त्याला डोंगरावर, त्याचा जीव घेण्यासाठी देवाला प्रार्थना करताना पाहतो. आणि, तुम्ही पहा, ही प्रेरणा आहे. आणि जेव्हा या गोष्टी घडतात, तेव्हा ते—ते तुम्हाला काहीतरी करते.

79 मग मला आठवते पुढे जाताजाता. आता मी तरुण व्हायला हवे. (पुढील थोड्या वेळात ते बनवण्याची मी घाई करेन.) जेव्हा मी तरुण झालो तेव्हा माझ्याही सर्व तरुणांसारख्या कल्पना होत्या. मी...शाळेत जाताना, मला त्या लहान मुली सापडल्या. तुम्हाला माहिती आहे, मी खरोखर लाजरा होतो, तुम्हाला माहिती आहे. आणि मला—मला शेवटी एक छोटी मैत्रीण मिळाली. आणि सर्व लहान मुलांप्रमाणे, सुमारे पंधरा वर्षांचा, माझा अंदाज आहे. आणि—आणि म्हणून, होय, ती सुंदर होती. माझे, तिचे डोळे कबुतरासारखे होते, आणि तिचे दात मोत्यासारखे होते, आणि मान हंसासारखी होती, आणि ती—ती खरोखर सुंदर होती.

80 आणि दुसरा लहान मुलगा, तो...आम्ही मित्र होतो, म्हणून त्याला त्याच्या वडिलांची जुनी मॉडेल–टी फोर्ड मिळाली, आणि आम्हाला आमच्या मुलींसोबत तारीख मिळाली. आणि आम्ही त्यांना बाहेर नेणार होतो, फिरायला. आमच्याकडे दोन गॅलन पेट्रोल खरेदी करण्यासाठी पुरेसे पैसे होते. ते क्रँक करण्यासाठी आम्हाला मागील चाक जॅक करावे लागले. मला माहित नाही की तुला ते कधी आठवते की नाही, तुला माहित आहे, ते विक्षिप्त करण्यासाठी. पण आम्ही—आम्ही खूप छान चाललो होतो.

81 आणि म्हणून माझ्या खिशात काही निकल्स होत्या, आणि आम्ही काही ठिकाणी थांबलो आणि पोहोचलो...तुम्ही एका निकेलने एक हॅम सँडविच घेऊ शकत होता. आणि म्हणून, अरे, मी श्रीमंत होतो, मी त्यापैकी चार विकत घेऊ शकलो! पहा? आणि सँडविच खाऊन कोक प्यायल्यावर, मी बाटल्या परत घ्यायला सुरुवात केली. आणि जेव्हा मी बाहेर आलो, तेव्हा मला आश्चर्य वाटले, (स्त्रियांनी त्या वेळी कृपेतून, किंवा स्त्रीत्वापासून पडणे सुरू केले होते) माझी छोटी कबुतर सिगारेट ओढत होती.

82 बरं, सिगारेट ओढणाऱ्या स्त्रीबद्दल माझं नेहमीच मत होतं, आणि तेव्हापासून मी त्यात थोडाही बदल केलेला नाही. ते बरोबर आहे. ती सर्वात नीच गोष्ट आहे जी ती करू शकते. आणि ते अगदी बरोबर आहे. आणि मला—मला मला वाटले मी...आता, सिगारेट कंपनी यासाठी माझा पाठलाग करू शकते, परंतु, मी तुम्हाला सांगतो, ते फक्त लक्ष वेधण्यासाठी सैतानाने केलेले धाडस आहे. या देशाला मिळालेली ही सर्वात मोठी मारक आणि घातपात करणारे साधन आहे. माझा मुलगा सिगारेट ओढणारा असण्यापेक्षा मद्यधुंद असलेला चालेल. हेच सत्य आहे. मी माझ्या पत्नीला सिगारेट घेऊन पाहण्यापेक्षा तिला जमिनीवर, मद्यधुंद अवस्थेत पडलेले पाहणे पसंत करीन. असेच आहे...

83 आता, हा देवाचा आत्मा जो माझ्यासोबत आहे, जर तो देवाचा आत्मा असेल (जसे तुम्ही विचारू शकता), जेव्हा तुम्ही तिथे पोहोचता तेव्हा तुम्ही सिगारेट ओढण्याची शक्यता फार कमी आहे,' कारण ते फक्त...प्रत्येक वेळी. तो त्याचा कसा निषेध करतो हे तुम्ही व्यासपीठावर पाहता. ती एक भयंकर गोष्ट आहे. त्यापासून दूर राहा. स्त्रियांनो, जर तुम्ही त्याबद्दल दोषी असाल तर, कृपया, ख्रिस्ताच्या नावाने, त्यापासून दूर जा! तो तुम्हाला तोडतो. ते तुम्हाला मारून टाकेल. ते...तो एक—तो एक कार्लोड्सचा कर्करोग आहे.

84 डॉक्टर तुम्हाला सावध करण्याचा प्रयत्न करतात. आणि मग ते तुम्हाला ती वस्तू कशी विकू शकतात! जर तुम्ही औषधाच्या दुकानात जाऊन म्हणाल, "खरेदी करा...मला पन्नास सेंट किमतीचा कर्करोग विकत घ्यायचा आहे." का, ते त्यांना कुलूप लावायला येतील. पण जेव्हा तुम्ही पन्नास–सेंट किमतीची सिगारेट खरेदी करता, तेव्हा तुम्ही तीच गोष्ट विकत घेता. डॉक्टर असे सांगतात. अरे, हे पैशाचे वेडे राष्ट्र. हे खुप वाईट आहे. ते हत्या करणारे आहे. ते सिद्ध झाले आहे.

85 बरं, जेव्हा मी त्या सुंदर मुलीला तिच्या हातात ही सिगारेट घेत, फक्त हुशारी मारताना पाहिलं, जणू काही ते मला मारत आहे, कारण मला वाटले की मी तिच्यावर प्रेम करतो. आणि मला वाटलं, "बरे..."

86 आता, मला एक "स्त्रीद्वेषी," म्हणतात तुम्हाला ते माहीत आहे, कारण मी नेहमीच एक प्रकारे स्त्रियांच्या विरोधात असतो, पण बहिणींनो तुमच्या विरोधात नाही. मी आधुनिक स्त्रियांच्या वागण्याच्या विरोधात आहे. ते बरोबर आहे. चांगल्या स्त्रियांनी स्वतःला पूर्णपणे झाकून ठेवले पाहिजे.

87 पण मला आठवते की माझे वडील अजूनही तिथे दारू गाळण्याची भट्टी चालवत असत, मला पाणी आणि सामान घेऊन बाहेर पडावे लागले असे, तेथे माझ्या वयाच्या पुरुषांसोबत, मद्यधुंद अवस्थेत, तरुण स्त्रिया पहिल्या ज्या सतरा, अठरा वर्षांपेक्षा जास्त वयाच्या नव्हत्या. आणि त्यांना त्या शांत कराव्या लागे आणि त्यांना ब्लॅक कॉफी द्यावी लागे, त्यांच्या पतीचे रात्रीचे जेवण बनवण्यासाठी त्यांना घरी न्यावे लागे. अरे, असंच काहीसं, मी म्हणालो, "मी..." तेव्हा ही माझी टिप्पणी होती, "त्यांना चांगल्या स्वच्छ गोळीने मारावे ह्या योग्यतेच्या त्या नाहीत." ते बरोबर आहे. आणि मी स्त्रियांचा तिरस्कार केला. ते बरोबर आहे. आणि त्याच गोष्टीचा विचार करू नये म्हणून मला आता प्रत्येक हालचाली पहाव्या लागतील.

88 तर, पण आता, एक चांगली स्त्री पुरुषाच्या मुकुटातील रत्न आहे. तिचा सन्मान व्हायला हवा. ती...माझी आई एक स्त्री आहे, माझी पत्नी आहे आणि त्या सुंदर आहेत. आणि मला अशा हजारो ख्रिस्ती बहिणी आहेत ज्यांचा मी खूप आदर करतो. पण जर—जर त्या देवाने त्यांना जे बनवले आहे, एक मातृत्व आणि खरी राणी याचा आदर करू शकतील, तर ते ठीक आहे. ती देवाने मनुष्याला देऊ शकणाऱ्या सर्वोत्कृष्ट गोष्टींपैकी, एक पत्नी होती. तारणाखेरीज, पत्नी सर्वोत्कृष्ट गोष्ट असेल जर ती चांगली पत्नी आहे. पण जर ती नसेल, शलमोनाने म्हटले आहे, "एक चांगली स्त्री पुरुषाच्या मुकुटातील एक रत्न आहे, पण एक—लाज आणणारी किंवा चांगली–नसणारी त्याच्या रक्तात पाणी आहे." आणि ते बरोबर आहे, ही सर्वात वाईट गोष्ट होऊ शकते. तर एक चांगली स्त्री... जर तुम्हाला एक चांगली पत्नी मिळाली आहे, भाऊ, तर तुम्ही तिचा सर्वोच्च आदर केला पाहिजे. ते बरोबर आहे, तुम्ही ते करायला हवे. एक खरी स्त्री! आणि मुलांनो, जर तुम्हाला खरी आई मिळाली असेल जी घरी राहते आणि तुमची काळजी घेण्याचा प्रयत्न करते, तुमचे कपडे स्वच्छ ठेवते, तुम्हाला शाळेत पाठवते, तुम्हाला येशूबद्दल शिकवते, त्या गोड म्हाताऱ्या आईचा तुझ्यात जे काही आहे त्याने तू सन्मान केला पाहिजे. तुम्ही त्या स्त्रीचा आदर केला पाहिजे, होय, श्रीमान, कारण ती खरी आई आहे.

89 ते केंटकी पर्वतांच्या निरक्षरतेबद्दल बोलतात. आपण ते येथे ह्या निरक्षर व साधेभोळ्या संस्कृतिमध्ये पहातो. त्यांच्यापैकी काही वयस्कर माता इथे हॉलीवूडला येऊ शकतात आणि तुम्हा आधुनिक मातांना शिकवू शकतात की तुमच्या मुलांना कसे वाढवायचे. तूम्ही त्या वयस्कर मातांना एका रात्री तिच्या मुलीला तिच्या विस्कटलेल्या केसांसह, आणि लिप्स...स्लिप्स, (तुम्ही याला काय म्हणता?) त्यांनी त्यांच्या चेहऱ्यावर केलेली रंगरंगोटी, आणि तिचा ड्रेस सर्व एका बाजूला पिळून काढलेला, आणि नशेत, रात्रभर बाहेर राहिलेली, आत येऊ द्या भाऊ, ती माता तिला त्या हिकॉरी झाडावरच्या फांदीने जर एक देईल आणि तर ती यापुढे कधीही बाहेर पडणार नाही. मी तुम्हाला सांगतो, ती...आणि जर तुमच्याकडे त्यापेक्षा थोडे अधिक असेल, तर तुमच्या आजूबाजूला एक चांगले हॉलीवूड, आणि एक चांगले राष्ट्र असेल. ते बरोबर आहे. ते खरे आहे. "फक्त आधुनिक होण्याचा प्रयत्न करतात," ती—ती सैतानाच्या युक्त्यांपैकी एक आहे.

90 आता, ही लहान मुलगी, जेव्हा मी तिच्याकडे पाहिलं, तेव्हा माझे हृदय रक्तबंबाळ झाले. आणि मला वाटले, "गरीब बिचारी मुलगी."

आणि ती म्हणाली, "अरे, तुला सिगारेट हवी आहे, बिली?"

मी बोललो, "नाही, मॅडम." मी बोललो, "मी धूम्रपान करीत नाही."

91 ती म्हणाली, “आता, तू म्हणालास तू नाचत नाहीस.” त्यांना नृत्याला जायचे होते आणि मला तो करता येणार नाही. म्हणून ते म्हणाले की तेथे एक नृत्य चालू आहे, ज्याला ते सायकॅमोर गार्डन्स म्हणतात.

आणि मी म्हणालो, “नाही, मी नाचत नाही.”

92 ती म्हणाली, “आता, तु नाचत नाहीस, तु धूम्रपान करीत नाहीस, तु मद्यपान करीत नाहीस. तुला जीवनात कशी काय मजा करता येईल?”

93 मी बोललो, “बरं, मला मासे पकडायला आवडतात आणि मला शिकार करायला आवडते.” हे तिला रुचले नाही.

तर ती म्हणाली, “ही घे सिगारेट.”

आणि मी म्हणालो, “नाही, मॅडम, धन्यवाद. मी धूम्रपान करीत नाही.”

94 आणि मी गाडीच्या बोर्डवर उभा होतो. जुन्या फोर्ड गाडीवर असा बोर्ड होता, तुम्हाला आठवत असेल, आणि मी त्या बोर्ड वर उभा होतो, ती मागच्या सीटवर बसली होती, ती आणि मी. आणि ती म्हणाली, “तुला म्हणायचे आहे की तु सिगारेट ओढणार नाहीस?” म्हणाली, “आणि आम्हा मुलींकडे तुमच्यापेक्षा जास्त धैर्य आहे.”

मी बोललो, “नाही, मॅडम, मला ते करायचे आहे यावर माझा विश्वास नाही.”

95 ती म्हणाली, “का, तू मोठा बायल्या!” अरे, देवा! मला मोठा वाईट बिल व्हायचे होते, म्हणून मी—मला नक्कीच बायल्या असे काहीही नको होते. बघा, मला बक्षीसवीर व्हायचे होते, हीच माझी जीवनाची कल्पना होती. म्हणून मी म्हणालो…“बायल्या! बायल्या!”

96 मी ते सहन करू शकलो नाही, म्हणून मी म्हणालो, “ती मला दे!” माझा हात पुढे केला, मी म्हणालो, “मी बायल्या आहे की नाही हे मी तिला दाखवीन.” ती सिगारेट बाहेर काढली आणि माचिस पेटवायला सुरुवात केली. आता, मला माहित आहे की तू आहेस…आता, तुम्हाला काय वाटते त्यासाठी मी जबाबदार नाही, मी फक्त सत्य सांगण्यासाठी जबाबदार आहे. जेव्हा मी ती सिगारेट पेटवायला सुरुवात केली, तेव्हा ती सिगारेट ओढण्याचा मी तितकाच निश्चय केला जितका मी हे बायबल आज दृढ निश्चयाने उचलतो, समजले, मी ऐकले काहीतरी जात आहे, “हूऊश्श!” मी पुन्हा प्रयत्न केला, मी ते माझ्या मुखात घेऊ शकलो नाही. आणि मी रडायला लागलो, मी ती वस्तू खाली फेकली. ते माझ्यावर हसायला लागले. आणि मी घरी गेलो, शेतातून वर गेलो, रडत रडत, तेथे बाहेर बसलो. आणि—आणि ते एक कठीण जीवन होते.

97 आठवते एके दिवशी बाबा मुलांसोबत नदीवर जात होते. मी आणि माझा भाऊ, आम्हाला बोट घेऊन नदीत वर–खाली जावे लागत होते, व्हिस्की भरण्यासाठी बाटल्यां शोधाव्या म्हणून. नदीकाठी त्यांना उचलण्यासाठी, आम्हाला त्यांच्यासाठी डझनभर बाटल्यांवर एक निकल मिळत असे. आणि बाबा माझ्यासोबत होते, आणि त्यांच्याकडे बाटल्यांपैकी एक बाटली होती…मला वाटते की त्या अंदाजे छोट्या मापाच्या बाटल्या होत्या. आणि तेथे एक जळलेले झाड खाली पडले होते, आणि बाबा…आणि श्रीमान डॉर्नबुश, हे त्यांच्या सोबत होते. माझ्याकडे…त्याच्याकडे एक छान बोट होती, आणि मला त्याची मर्जी मिळवायची होती कारण मला ती बोट वापरायची होती. त्यांच्या बोटीत एक चांगले सुकाणू होते आणि माझ्या बोटीत सुकाणू मुळीच नव्हते. आमच्याकडे पायडल मारण्यासाठी फक्त जुन्या पाट्या होत्या. आणि माझी इच्छा होती त्याने मला ती बोट वापरू द्यावी…म्हणून, ते वेलडिंग करत होते आणि बाबांसाठी दारू गाळणाच्या भट्ट्या बनवीत

होते. म्हणून त्याने...त्यांनी आपला पाय त्या झाडावर ठेवले, आणि बाबांनी त्याच्या मागच्या खिशात हात घालून व्हिस्कीची छोटीशी बाटली बाहेर काढली, ती त्याला दिली आणि त्याने एक घोट घेतला, ती वडिलांना परत दिली आणि त्याने एक घोट घेतला, आणि बाहेर गेलेल्या झाडाच्या कडेला असलेल्या एका लहान डहाळीवर त्याने ते ठेवले. आणि श्रीमान डॉर्नबुश यांनी ती वर उचलली, म्हणाले, "इथे तू आहेस, बिली."

मी बोललो, "धन्यवाद, मी पीत नाही."

98 तो म्हणाला, "एक ब्रॅन्हम, आणि पित नाहीस?" जवळजवळ सर्वच जण दारू पित मरण पावले. आणि तो म्हणाला, "एक ब्रॅन्हम, आणि पित नाहीस?"

मी म्हटले, "नाही, महाशय."

"नाही," बाबा म्हणाले, "मी एका बायल्याला वाढविले आहे."

99 माझे बाबा मला बायल्या म्हणत आहेत! मी बोललो, "ती बाटली मला द्या!" आणि मी ते झाकण त्याच्या वरच्या भागातून बाहेर काढले, ती प्यायचे ठरविले, आणि जेव्हा मी ती ओतू लागलो, "व्हूशssssh!" मी ती बाटली परत दिली आणि रडत रडत, शेतातून लगेचच खाली गेलो. काहीतरी मला ते करू देणार नव्हते. पहा? मी काही चांगला होतो असे मी म्हणू शकत नाही (मी ते करण्याचा निर्धार केला होता), पण तो देव, कृपा, अद्भुत कृपा आहे ज्याने मला त्या गोष्टी करण्यापासून रोखले. मला ते स्वतः, करायचे होते, पण त्याने मला ते करू दिले नाही.

100 नंतर मला एक मुलगी सापडली जेव्हा मी बावीस वर्षांचा होतो, ती मला प्रिय होती. ती एक मुलगी होती जी चर्चमध्ये जात होती, जर्मन लुथेरन. तिचे नाव ब्रुम्बाच, B−r−u−m−b−a−c−h, ब्रुम्बाच च्या नावावरून आले. आणि ती एक छान मुलगी होती. तिने धूम्रपान किंवा मद्यपान केले नव्हते, किंवा—किंवा ती कधी नाचली नव्हती किंवा असे काहीही केले नव्हते, एक चांगली मुलगी. मी तिच्याबरोबर थोडा वेळ गेलो, आणि मी... तेव्हा, जवळजवळ बावीस वर्षांचा होतो, मला जुनी फोर्ड विकत घेत येईल एवढे पुरेसे पैसे कमावले होते, आणि मी...आम्ही एकत्र फिरायला जायचो. आणि म्हणून, त्या वेळी, ल्यूथरन चर्च जवळ नव्हते, ते हॉवर्ड पार्कमधून वर राहण्यास गेले होते.

101 आणि म्हणून ते होते...एक सेवक, ज्याने मला मिशनरी बॅप्टिस्ट चर्चमध्ये नियुक्त केले, डॉक्टर रॉय डेव्हिस. बहीण अपशॉ, ज्याने बंधू अपशॉ यांना माझ्याकडे पाठवले किंवा त्यांच्याशी माझ्याबद्दल बोलले, डॉक्टर रॉय डेव्हिस. आणि म्हणून ते प्रचार करीत होते, आणि त्याच्याकडे फर्स्ट बॅप्टिस्ट चर्च होते, किंवा ते—ते...माझा विश्वास नाही की ते पहिले बाप्टिस्ट चर्च होते, कदाचित, ती एक मिशन−...ज्यास जेफरसनविले येथील मिशनरी बॅप्टिस्ट चर्च म्हणतात. आणि ते त्या वेळी त्या ठिकाणी प्रचार करीत होते, आणि आम्ही रात्री चर्चमध्ये जायचो, म्हणून...आणि आम्ही परत यायचो. आणि मी कधीही त्या चर्चमध्ये सामील झालो नाही, परंतु मला तिच्याबरोबर जायला आवडत असे. कारण मुख्य विचार होता "तिच्यासोबत जाणे," मी केवळ प्रामाणिक असू शकतो.

102 म्हणून मग तिच्या सोबत जायचो, आणि एके दिवशी मी...ती एका चांगल्या कुटुंबातील होती. आणि मी विचार करू लागलो, "तुला माहीत आहे, तुला माहीत आहे, मी त्या मुलीचा वेळ घेऊ नये. ते नाही—ते बरोबर नाही, कारण ती एक चांगली मुलगी आहे, आणि मी गरीब आहे आणि—आणि मी..." माझ्या बाबांची तब्येत बिघडली होती, आणि मी—मी...माझ्यासाठी अशा मुलीसाठी उदरनिर्वाह करण्याचा कोणताही मार्ग नव्हता, जिला एका छान घराची सवय झाली होती आणि जमिनीवर गालिच्याची.

103 मी पाहिलेला पहिला गालिचा मला आठवतो, तो काय होता हे मला माहीत नव्हते. मी त्याच्या बाजूने चाललो. मला वाटले की मी माझ्या आयुष्यात पाहिलेली सर्वात सुंदर गोष्ट ती आहे. “ते असे काहीतरी जमिनीवर कसे ठेवतील?” मी पाहिलेला तो पहिला गालिचा होता. ते होते—ते यापैकी एक होते…मला वाटते की त्यास “चटईचा गालीचा” म्हणतात. माझी ती चूक असू शकते. काही प्रकारचे “वेताच्या काड्या” किंवा असे काहीतरी जे वळून बांधलेले आहे, आणि जमिनीवर ठेवलेले. सुंदर हिरवे आणि लाल, आणि मध्यभागी मोठे गुलाब काम केलेले, तुम्हाला माहिती आहे. ती एक सुंदर वस्तु होती.

104 आणि म्हणून मला आठवते मी—मी एकतर तिला माझ्याशी लग्न करायला सांगावं असं ठरवलं, किंवा मी दूर जावे आणि एखादया चांगल्या मनुष्याला तिच्याशी लग्न करू द्यावे, कोणीतरी जे तिच्यासाठी चांगले असेल, तिला सांभाळू शकेल आणि तिच्याशी दयाळू असेल. मी तिच्याशी दयाळू असू शकतो, परंतु मी—मी—मी तासाला फक्त वीस सेंट कमवत होतो. त्यामुळे मी तिच्यासाठी चांगला उदरनिर्वाह करू शकत नव्हतो. आणि मी…सर्व कुटुंबासह आम्हाला काळजी घ्यावी लागत होती, आणि वडिलांची तब्येत खालावली, आणि मला त्यांची सर्व काळजी घ्यावी लागत होती, त्यामुळे मला खूप त्रास होत होता.

105 म्हणून मला वाटले, “बरं, माझ्यासाठी एकच गोष्ट होती की तिला सांगावे की मी—मी…ती…मी—मी परत येणार नाही, कारण मी तिच्याबद्दल खूप विचार केला होता की तिचे आयुष्य उध्वस्त करावे आणि माझ्याबरोबर तिला मूर्ख बनवावे.” आणि मग मला वाटलं, “जर कोणी तरी तिच्याशी लग्न करू शकत असेल आणि एक सुंदर घर बनविल. आणि कदाचित जर मला ती मिळू शकणार नाही, मला शकेल—मला समजू शकेल की ती आनंदी आहे.”

106 आणि म्हणून मला वाटले, “पण मी—मी फक्त—मी फक्त तिला सोडू शकत नाही!” आणि मी—मी एक भयानक स्थितीत होतो. आणि दिवसेंदिवस मी त्याचा विचार करत असे. त्यामुळे तिला माझ्याशी लग्न करायला सांगायला मला खूप लाज वाटली. रोज रात्री मी मनात ठरवायचो, “मी तिला विचारणार आहे.” आणि, जेव्हा मी, अरे, ते काय आहे, फुलपाखरे, किंवा काहीतरी तुम्हाला तुमच्यामध्ये मिळते…? तुम्हा सर्व बंधुना कदाचित असाच अनुभव तेथे आला असेल. आणि एक खरी मजेदार भावना, माझा चेहरा गरम होईल. मला—मला कळत नव्हते. मी तिला विचारू शकलो नाही.

107 त्यामुळे माझे लग्न कसे झाले असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. तुम्हाला माहित आहे काय? मी तिला पत्र लिहिले आणि विचारले. आणि म्हणून तिला…आता, ते “प्रिय मिस, नव्हते,” त्यापेक्षा प्रेमाच्या बाजूने (तुम्हाला माहित आहे) ते थोडे अधिक होते. तो फक्त एक—एक करार नव्हता, तो होता…मी—मी ते लिहिलं, उत्तम जे मला शक्य होते.

108 आणि मला तिच्या आईची थोडी भीती वाटत होती. तिची आई होती…ती एक प्रकारची उद्धट होती. आणि, पण तिचे वडील एक सभ्य वृद्ध डचमन होते, फक्त एक चांगला वृद्ध व्यक्ति. ते बंधुत्वाचा, ट्रेनमॅनचा, रेल्वेमार्गावरील संघटक होते, त्या काळात दरमहा सुमारे पाचशे डॉलर्स कमवत होते. आणि मी तासाला वीस सेंट कमवत होतो, त्याच्या मुलीशी लग्न करण्यासाठी. उह! मला माहित होते की त्याने काहीही होणार नाही. आणि तिची आई खूप होती…आता, ती एक छान स्त्री आहे. आणि ती—ती या उच्च समाजांपैकी एक होती, तुम्हाला माहित आहे, आणि चोखंदळ अशी, तुम्हाला माहित आहे, आणि कसे ही असो त्यामुळे तिची मला फारशी मदत झाली नाही. मी फक्त एक

जुना साधा गावढंळ मुलगा होतो, आणि तिला वाटत होते की होपने थोड्या चांगल्या श्रेणीच्या मुलाबरोबर जावे, आणि मला—मला—मला वाटतं ती बरोबर होती. आणि म्हणून...पण मला—मला त्यावेळी तसे वाटत नव्हते.

109 म्हणून मला वाटले, “बरं, आता, मला माहित नाही कसे. मी—मी तिच्या बाबांना विचारू शकत नाही, आणि मी—मी तिच्या आईला विचारणार नाही याची खात्री आहे. आणि म्हणून मला तिला आधी विचारले पाहिजे.” म्हणून मी पत्र लिहिले. आणि त्या दिवशी सकाळी कामाच्या रस्त्यावर, मी ते टपालपेटी मध्ये टाकले. ते पत्र...आम्ही बुधवारी रात्री चर्चला जात होतो, आणि ते सोमवारी सकाळी टाकले होते. मी रविवारी दिवसभर तिला सांगण्याचा प्रयत्न केला की मला लग्न करायचे आहे, आणि मी पुरेशी हिम्मत करू शकलो नाही.

110 म्हणून मग मी ते टपालपेटी मध्ये टाकले. आणि त्या दिवशी कामावर असताना मला वाटलं, “जर ते पत्र तिच्या आईच्या हातात पडले तर काय होईल?” अरे, बापरे! मग मला कळलं की मी उध्वस्त झालोय जर—जर कधी तिच्या हातात ते पडले, कारण तिला माझ्याबद्दल फारशी काळजी नव्हती. बरं, मला सतत घाम फुटत होता.

111 आणि त्या बुधवारी रात्री जेव्हा मी आलो, अरे, बापरे, मला वाटले, “मी तिथे वर कसा जाणार आहे? जर तिच्या आईला ते पत्र मिळाले तर ती खरोखरच माझी वाट लाविल, म्हणून मला आशा होती की तिला ते मिळाले आहे.” मी ते “होपला” लिहिले होते. ते तिचं नाव होतं, होप. आणि म्हणून मी म्हणालो, “मी येथे बाहेर लिहीन फक्त होपसाठी.” आणि म्हणून...आणि मला वाटले की कदाचित तिला ते मिळाले नसेल.

112 त्यामुळे मला चांगले माहीत होते की बाहेर थांबावे आणि तिला बाहेर बोलावण्यासाठी हॉर्न वाजवावा. अरे, बापरे! आणि कोणताही मुलगा ज्याला घरापर्यंत चालत जाण्याची आणि दार ठोठावण्याची आणि मुलीला विचारण्याची पुरेशी हिम्मत नाही, त्याला तिच्याबरोबर बाहेर जाण्याचे काहीही काम नाही. ते अगदी बरोबर आहे. ती खूप मूर्खता आहे. ते कमी दर्जाचे आहे.

113 आणि म्हणून मी माझी जुनी फोर्ड थांबवली, तुम्हाला माहित आहे, आणि मी तिला चकाचक केली होती. आणि म्हणून मी वर गेलो आणि दार ठोठावले. देवा दया कर, तिची आई दारात आली! मला श्वास घेता आला नाही, मी म्हणालो, “कसे—कसे—तुम्ही कसे आहात, मिसेस ब्रुम्बाच?” हं.

114 ती म्हणाली, “विल्यम, तू कसा आहेस.”

मला वाटले, “अरे, ‘विल्यम’!”

आणि—आणि ती म्हणाली, “तुम्ही आत याल का?”

115 मी बोललो, “धन्यवाद.” मी दारातून आत शिरलो. मी म्हणालो, “होप तयार आहे का?”

116 आणि तितक्यात इथे होप घरातून बाहेर पडली, फक्त सोळा वर्षांची मुलगी. आणि ती म्हणाली, “हाय, बिली!”

117 आणि मी म्हणालो, “हाय, होप.” आणि मी म्हणालो, “तु चर्चसाठी तयार आहेस का?”

ती म्हणाली, “फक्त एका मिनिटात.”

118 मला वाटले, “अरे, बापरे! तिला ते कधीच मिळाले नाही. तिला ते कधीच मिळाले नाही. चांगले, चांगले, चांगले. होपला ते कधीच मिळाले नाही, म्हणून सर्व काही ठीक होईल, कारण तिने मला ते नाव दिले असेल.” त्यामुळे मला एकदम बरे वाटले.

119 आणि मग जेव्हा मी चर्चमध्ये उतरलो तेव्हा मला वाटू लागले, “जर तिला मिळाले तर काय होईल?” पहा? आणि डॉक्टर डेव्हिस काय बोलत होते ते मला ऐकू येत नव्हते. मी तिच्याकडे पाहिले, आणि मला वाटले, “जर कदाचित तिने ते मागे धरले असेल तर, आणि मी इथून बाहेर पडल्यावर ती मला नकार सांगणार आहे, तिला हे विचारल्याबद्दल.” आणि बंधू डेव्हिस काय बोलत होते ते मला ऐकू येत नव्हते. आणि—आणि मी तिच्याकडे पाहिले, आणि मला वाटले, “खरंच, तिला सोडून देणे मला आवडणार नाही, पण… आणि मी—मी…हयाचा शेवट तर नक्की येणार आहे.”

120 म्हणून चर्च नंतर आम्ही एकत्र रस्त्यावरून चालायला लागलो, घरी जाऊ लागलो, आणि—आणि म्हणून आम्ही जुन्या फोर्डकडे निघालो. आणि त्यामुळे सर्वत्र चंद्र प्रखरतेने चमकत होता, तुम्हाला माहित आहे, मी पाहत होतो आणि ती सुंदर होती. मुला, मी तिच्याकडे पाहिले, आणि मला वाटले, “खरंच, ती माझी झाली तर मला किती आवडेल, परंतु मी हे करू शकत नाही.”

121 आणि म्हणून मी थोडे दूर चाललो, तुम्हाला माहित आहे, आणि मी पुन्हा तिच्याकडे पाहिले. मी म्हटले, “कसे—आज रात्री तुला कसे वाटत आहे?”

ती म्हणाली, “अरे, मी ठीक आहे.”

122 आणि आम्ही जुनी फोर्ड खाली थांबवली आणि आम्ही बाहेर पडू लागलो, तुम्हाला माहित आहे, आजूबाजूने, कोपऱ्याभोवती फिरून तिच्या घरी जात होतो. आणि मी तिच्याबरोबर दारापर्यंत चालत होतो. मला वाटले, “तुला माहित आहे, तिला कदाचित पत्र कधीच मिळाले नाही, म्हणून मी कदाचित ते विसरू शकतो. तरीही माझ्याकडे आणखी एक कृपेचा आठवडा असेल.” त्यामुळे मला खूप बरे वाटू लागले.

ती म्हणाली, “बिली?”

मी म्हणालो, “होय.”

ती म्हणाली, “मला तुझे पत्र मिळाले.” अरे, काय म्हणतेस!

मी बोललो, “तुला मिळाले?”

123 ती म्हणाली,“उह-हह.” बरं, ती तशीच चालत राहिली, दुसरा शब्द कधीही बोलली नाही.

124 मला वाटले, “बाई, मला काहीतरी सांग. माझ्यापासून दूर जा किंवा तुला याबद्दल काय वाटते ते मला सांग.” आणि मी म्हणालो, “तू ते—तु ते वाचलेस का?”

ती म्हणाली, “उह-हह.”

125 खरंच, एक स्त्री तुम्हाला रहस्यात कशी ठेवू शकते हे तुम्हाला माहीत आहे. अरे, मी—मला असे म्हणायचे नव्हते, तुम्ही समजले. पहा? पण, तरीही, तुम्हाला माहित आहे, मला—मला वाटले, “काही का तू बोलत नाहीस?” पहा, आणि मी पुढे जात राहिलो. मी बोललो, “तु ते सर्व वाचलेस का?”

आणि ती…[टेपवरील रिक्त स्थान—संपा.] “उह-हह.”

126 तर आम्ही जवळजवळ दारापर्यंत पोहोचलो होतो, आणि मला वाटले, "मुला, मला व्हरांड्यावर आणू नकोस, कारण मी त्यांच्यापुढे धावू शकत नाही, म्हणून तू मला आता सांग." आणि म्हणून मी वाट पाहत राहिलो.

127 आणि ती म्हणाली, "बिली, मला ते करायला आवडेल." ती म्हणाली, "मी तुझ्यावर प्रेम करते." देव आता तिच्या आत्म्याला आशीर्वादित करो, ती गौरवात आहे. ती म्हणाली, "मी तुझ्यावर प्रेम करते." म्हणाली, "मला वाटते की आपण आपल्या पालकांना सांगायला हवे...त्याबद्दल पालकांना. तुला असं वाटत नाही का?"

128 आणि मी म्हणालो, "प्रिये, ऐक, पन्नास-पन्नास प्रस्तावाने याची सुरुवात करू या." मी बोललो, "तू तुझ्या आईला सांगशील तर मी तुझ्या बाबांना सांगेन." सुरुवात करण्यासाठी, तिच्यावर कठीण भाग टाकला.

ती म्हणाली, "ठीक आहे, जर तुम्ही आधी बाबांना सांगाल तर."

मी बोललो, "ठीक आहे, मी रविवारी रात्री त्यांना सांगेन."

129 आणि म्हणून रविवार रात्र आली, मी तिला चर्चमधून घरी आणले आणि मी...ती माझ्याकडे बघतच राहिली. आणि मी पाहिलं, आणि साडे नऊ वाजले होते, माझी जायची वेळ झाली होती. तर चार्ली त्याच्या डेस्कवर बसून टायपिंग करीत होते. आणि श्रीमती ब्रुम्बाच कोपऱ्यावर बसून, एक प्रकारचे विणकाम करत आहेत, तुम्हाला माहीत आहे, किंवा त्या लहान हुप्स तुम्ही गोष्टींवर ठेवता, तुम्हाला माहीत आहे. तुम्ही याला काय म्हणता हे मला माहीत नाही. आणि म्हणून ती अशा काही गोष्टी करत होती. आणि होप माझ्याकडे पाहत राहिली, आणि तिने माझ्याकडे रागाने पाहिले, तुम्हाला माहिती आहे, तिच्या वडिलांकडे खूण केली. आणि मी...ओह, देवा! मला वाटले, "जर त्याने 'नाही' म्हटले तर काय?" म्हणून मी दाराकडे जाण्यास निघालो, मी म्हणालो, "ठीक आहे, मला वाटते की मी जाणे चांगले आहे."

130 आणि मी दारापाशी गेलो, आणि—आणि ती माझ्याबरोबर दाराकडे येऊ लागली. ती नेहमी दारात येऊन मला सांगायची "शुभ रात्री." म्हणून मी दाराकडे जाऊ लागलो, आणि ती म्हणाली, "तू त्याला सांगणार आहेस की नाही?"

131 आणि मी म्हणालो, "हं!" मी बोललो, "मी नक्कीच प्रयत्न करत आहे, पण मी—मी—मी ते कसे करणार आहे हे मला माहित नाही."

132 आणि ती म्हणाली, "मी परत जाईन आणि तू त्याला बाहेर बोलव." असे म्हणून ती मागे फिरली आणि मला तिथेच उभी सोडून गेली.

आणि मी म्हणालो, "चार्ली."

तो मागे वळून म्हणाला, "होय, बिल?"

मी म्हणालो, "मी तुझ्याशी एक मिनिट बोलू शकतो का?"

133 तो म्हणाला, "नक्की." तो त्याच्या डेस्कवरून मागे वळला. श्रीमती ब्रुम्बाचने त्याच्याकडे पाहिले, होपकडे पाहिले, आणि माझ्याकडे पाहिले.

आणि मी म्हणालो, "तू बाहेर व्हरांड्यावर येशील का?"

आणि तो म्हणाला, "होय, मी बाहेर येईन." म्हणून तो बाहेर व्हरांड्यावर गेला.

मी बोललो, "नक्कीच एक सुंदर रात्र आहे, नाही का?"

आणि तो म्हणाला, "होय, आहे."

मी बोललो, “नक्कीच उबदार आहे.”

“नक्कीच आहे,” त्याने माझ्याकडे पाहिले.

134 मी म्हणालो, “मी खूप मेहनत करीत आलो आहे,” मी म्हणालो, “तुला माहीत आहे, माझे हात ही कठिण झाले आहेत.”

तो म्हणाला, “तु तिला घेऊ शकतो, बिल.” अरे, देवा! “आपण तिला घेऊ शकता.”

135 मला वाटले, “अरे, ते अधिक चांगले आहे.” मी म्हणालो, “तुला खरंच म्हणायचंय, चार्ली?” तो म्हणाला...मी म्हणालो, “चार्ली, बघ, मला माहीत आहे की ती तुझी मुलगी आहे, आणि तुमच्याकडे पैसे आहेत.”

136 आणि त्याने जवळ येऊन माझा हात धरला. तो म्हणाला, “बिल, ऐक, पैसा या मानवी जीवनातल्या सर्व गोष्टी नाहीत.” तो म्हणाला...

137 मी बोललो, “चार्ली, मी—मी तासाला फक्त वीस सेंट कमावतो, पण मी तिच्यावर प्रेम करतो आणि ती माझ्यावर प्रेम करते. आणि मी तुला वचन देतो, चार्ली, मी तो पर्यंत काम करेन...माझे हात झीजेपर्यंत, तिच्या उदरनिर्वाहासाठी. मी तिच्याशी तितकाच खरा राहीन जेवढा मी असू शकतो.”

138 तो म्हणाला, “यावर माझा विश्वास आहे, बिल.” तो म्हणाला, “ऐक, बिल, मला तुला सांगायचे आहे.” म्हणाले, “तुला माहित आहे, आनंद, आनंदी होण्यासाठी पूर्णपणे पैशांची गरज असते असे नाही.” म्हणाले, “फक्त तिच्याशी चांगला रहा. आणि मला माहित आहे की तू करशील.”

मी बोललो, “धन्यवाद, चार्ली. मी ते नक्की करेन.”

139 मग तिची वेळ आईला सांगायची होती. तिला ती कशी मिळाली माहीत नाही, पण आमचे लग्न झाले.

140 म्हणून, जेव्हा आम्ही लग्न केले, तेव्हा आमच्याकडे काहीही नव्हते, घरकामासाठी काहीही नव्हते. मला वाटते की आमच्याकडे दोन किंवा तीन डॉलर्स होते. म्हणून आम्ही एक घर भाड्याने घेतले, त्यासाठी आम्हाला महिन्याला चार डॉलर्स लागत. ती एक छोटीशी, जुनी दोन खोल्यांची जागा होती. आणि कोणीतरी आम्हाला जुना फोल्डिंग बिछाना दिला. मला आश्चर्य वाटते की जर कोणी जुना फोल्डिंग बिछाना पाहिला असेल? आणि त्यांनी आम्हाला तो दिला. आणि मी खाली सीअर्स आणि रॉबक्सकडे गेलो आणि चार खुर्च्या असलेले एक लहान टेबल मिळाले, ते—ते रंगवलेले नव्हते, तुम्हाला माहित आहे, आणि आम्हाला ते वेळेवर मिळाले. आणि मग मी अडगळीचे सामान विकणाऱ्या, श्रीमान वेबर यांच्याकडे गेलो, आणि स्वयंपाकाची शेगडी विकत घेतली. मी त्यासाठी पंचाहत्तर सेंटस दिले, आणि त्यामध्ये जाळीसाठी एक डॉलर आणि काहीतरी दिले. आम्ही घर व्यवस्थित केले. मला आठवते की मी खुर्च्यांवर शेमरॉक घेतले आणि रंगवले होते. आणि, अरे, आम्ही तरीही, आनंदी होतो. आम्ही एकमेकांचे होतो, म्हणून हेच सर्व आवश्यक होते. आणि देव, त्याच्या दयेने आणि त्याच्या चांगुलपणाने, आम्ही पृथ्वीवरील सर्वात आनंदी जोडपे होतो.

141 मला हे आढळून आले की, जगातील किती वस्तु तुमच्याजवळ आहेत यात आनंद समावलेला नसतो, परंतु तुम्हाला देण्यात आलेल्या भागावर तुम्ही किती समाधानी आहात.

142 आणि, थोड्या वेळाने, देव खाली आला आणि आमच्या लहान घराला आशीर्वाद दिला, आम्हाला एक लहान मुलगा झाला. त्याचे नाव बिली पॉल होते, तो आता येथे सेवेत आहे. आणि तेव्हापासून थोड्या वेळाने, सुमारे अकरा महिन्यांनी, त्याने आम्हाला शेरॉन रोज नावाच्या एका लहान मुलीसह पुन्हा आशीर्वाद दिला, "शेरॉनचा गुलाब" ह्या शब्दातून नांव घेतले.

143 आणि मला आठवते की एके दिवशी मी माझे पैसे साठवले होते आणि मी थोडी सुट्टी घेणार होतो, पॉ पॉ लेक, ह्या ठिकाणी जाणार होतो, मासेमारी करण्यासाठी. आणि माझ्या परतीच्या रस्त्यावर...

144 आणि या काळात...मी माझ्या सेवकाई पासून दूर झालो. माझा पालट झाला होता. आणि मिशनरी बॅप्टिस्ट चर्चमध्ये सदस्य बनलो होतो, डॉक्टर रॉय डेव्हिस यांनी नियुक्त केले होते, आणि एक सेवक बनलो होतो आणि मी आता जेफरसनव्हिलमध्ये आराधनालयात प्रचार करीत होतो. आणि मी एका लहान चर्चचा पाळक होतो. आणि मी...

145 पैसे नाहीत, मी सतरा वर्षे चर्चचा पास्टर होतो आणि कधीही एक पैसाही घेतला नाही. माझा ह्यामध्ये विश्वास नव्हता—...तेथे त्यामध्ये अर्पणाचे पात्र देखील नव्हते. आणि माझ्याकडे कामाचा दशमांश किती होता, आणि पुढे, इमारतीच्या मागील बाजूस एक लहान पेटी होती, म्हटले, त्यावर एक छोटीशी खूण होती, "या माझ्या लहानांतील एकाला जे काही तुम्ही केले, ते तुम्ही माझ्यासाठी केले आहे." आणि मग अशा प्रकारे चर्चला पैसे दिले जात होते. ते फेडण्यासाठी आमच्याकडे दहा वर्षांचे कर्ज होते, आणि ते दोन वर्षांपेक्षा कमी वेळात फेडले गेले. आणि मी कधीही कोणत्याही प्रकारचे अर्पण घेतले नाही.

146 आणि मग माझ्याकडे, अरे, माझ्या सुट्टीसाठी मी काही डॉलर्स वाचवले होते. तिने, देखील, फाईन शर्ट फॅक्टरीमध्ये काम केले. एक सुंदर प्रिय मुलगी. आणि तिची कबर कदाचित आज बर्फाळ आहे, परंतु ती अजूनही माझ्या हृदयात आहे. आणि मला आठवते जेव्हा तिने मला या तलावावर मासे पकडण्यासाठी जाण्यास पुरेसे पैसे मिळावेत म्हणून खूप कष्ट केले.

147 आणि जेव्हा मी त्या तलावाहून परत येत होतो, तेव्हा मला मिशावाका आणि साऊथ बेंड, इंडियाना हे येताना दिसू लागले, आणि मला त्या गाड्या दिसायला लागल्या ज्यांच्या पाठीमागे खुणा होत्या, लिहिले होते, "फक्त येशू." आणि मला वाटलं, "ते विचित्र भासते, 'फक्त येशू.'" आणि मी ती चिन्हे पहाण्यास सुरुवात केली. आणि ते सगळ्यावर होते सायकलपासून, फोर्ड, कॅडिलॅक, आणि आणखी—कशावर, "फक्त येशू." आणि मी त्यांच्यापैकी काहींच्या मागे गेलो, आणि ते एका मोठ्या चर्चमध्ये आले. आणि मला कळले की ते पेन्टेकोस्टल होते.

148 मी पेन्टेकोस्टल बद्दल ऐकले होते, परंतु ते एक "पवित्र जनांचा समुह होते जे जमिनीवर लोळत आणि त्यांच्या तोंडावर फेस येत असे," आणि त्यांनी मला सांगितलेल्या सर्व गोष्टी. त्यामुळे मला त्याच्याशी काहीही करायचं नव्हतं.

149 म्हणून मी ते सर्व तेथे करताना ऐकले, आणि मला वाटले, "विश्वास ठेवा मी फक्त आत येईन." म्हणून मी माझी जुनी फोर्ड थांबवली आणि आत गेलो, आणि सर्व गाणे तुम्ही तुमच्या आयुष्यात कधीही ऐकलेले होते! आणि मला कळले की तेथे दोन मोठ्या मंडळ्या होत्या, त्यापैकी एक पी.ए. ऑफ जे.सी., आणि पी.ए. ऑफ डब्ल्यू., तुमच्यापैकी अनेकांना त्या जुन्या संघटना आठवत असतील—...मला वाटते की त्यांना युनायटेड,

आता संबोधले जाते, आणि युनायटेड पेन्टेकोस्टल चर्च म्हणतात. बरं, मी त्यांच्या काही शिक्षकांचे ऐकले आहे. आणि ते तिथे उभे होते, अरे, ते येशूबद्दल शिकवत होते आणि तो किती महान होता, आणि सर्व काही किती महान होते, आणि "पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा" ह्या विषयी. मला वाटले, "ते कशाबद्दल बोलत आहेत?"

150 आणि, थोड्या वेळाने, कोणीतरी उडी मारली आणि अन्य भाषेत बोलू लागले. बरं, मी माझ्या आयुष्यात असं काही ऐकले नव्हते. आणि इकडे एक बाई तेथून शक्य तितक्याच वेगाने धावत आली. मग सगळे उठून पळू लागले. आणि मला वाटलं, "बरं, भाऊ, त्यांच्याकडे निश्चितपणे चर्चचे शिष्टाचार नाहीत!" किंचाळीत आणि ओरडत आणि अशा प्रकारे पुढे, मला वाटले, "हा काय समुह आहे!" पण, तुम्हाला माहिती आहे, याबद्दल काहीतरी, मी अधिक वेळ तिथे बसलो, मला ते अधिक आवडले. काहीतरी खरोखर चांगले असल्याचे दिसत होते. आणि मी त्यांना पाहू लागलो. आणि ते पुढे गेले. मला वाटले, "मी त्यांच्याबरोबर थोडा वेळ सहन करीन, कारण मी...मी दाराच्या जवळ आहे. जर काही उतावीळपणे सुरू झाले, तर मी दारा बाहेर पळून जाईन. माझी गाडी कुठे उभी आहे हे मला माहीत आहे, अगदी कोपऱ्यात."

151 आणि मी त्यांच्यापैकी काही प्रचारकांचे ऐकू लागलो, जे विद्वान आणि विद्यार्थी होते. का, मला वाटले, "ते चांगले आहेत."

म्हणून रात्रीच्या जेवणाची वेळ आली, आणि म्हटले, "सर्वजण जेवायला या."

152 पण मला वाटलं, "एक मिनिट थांब. माझ्याकडे घरी जाण्यासाठी एक डॉलर आणि पंचाहत्तर सेंट आहेत, आणि मी..." माझ्याकडे पेट्रोलच्या पैशासाठी एवढेच होते. फक्त मला घरी नेण्यासाठी घेतले होते. आणि माझ्याकडे माझी जुनी फोर्ड होती, ती खूप चांगली जुनी फोर्ड होती. ती खराब झाली नव्हती, ती अगदी येथे बाहेर असलेल्या सारखी होती, फक्त झिजली होती. आणि ती...माझा वास्तविक विश्वास आहे की फोर्ड तासाला तीस मैल पुढे जाईल, पण अर्थात पंधरा *या* मार्गाने आणि पंधरा *या* मार्गाने. तुम्ही बघा, एकत्र ठेवा, तुमच्याकडे तीस आहेत. आणि म्हणून ती...मला वाटते, "बरं, त्या रात्री मला वाटले की मी बाहेर जाईन आणि नंतर..." मी रात्रीच्या सभेसाठी थांबलो होतो.

153 आणि, ओह, तो म्हणाला, "सर्व प्रचारक, कुठल्याही संप्रदायाचे असेनात, व्यासपीठावर या." बरं, तिथे आम्ही सुमारे दोनशे जण होतो, मी वर गेलो. आणि म्हणून तो म्हणाला, "आता, आपल्याकडे वेळ नाही की तुम्हा सर्वांना प्रचार करता येईल." तो म्हणाला, "फक्त या आणि तुम्ही कोण आहात आणि तुम्ही कुठून आहात ते सांगा."

154 बरं, माझी वेळ आली, मी म्हणालो, "विल्यम ब्रॅन्हम, बाप्टिस्ट. जेफरसनविले, इंडियाना." निघून गेलो.

155 मी त्यांना बाकी सर्वांना स्वतःला संबोधताना ऐकले, "पेन्टेकॉस्टल, पेंटेकॉस्टल, पेंटेकॉस्टल, पी.ए. ऑफ डब्ल्यू., पी.ए.जे.सी., पी.ए.डब्ल्यू., पी..."

156 मी चालत गेलो. मला वाटले, "बरं, मला वाटतं की मी कुरूप बदक आहे." म्हणून मी खाली बसलो, थांबलो.

157 आणि, त्या दिवशी, त्यांच्याकडे चांगले, तरुण प्रचारक होते, आणि त्यांनी जोरदार प्रचार केला होता. आणि मग ते म्हणाले, "आज रात्री संदेश आणणार आहेत..." माझा विश्वास आहे की त्यांनी त्याला बोलावले, "वडील." आणि त्यांचे सेवक, "आदरणीय," च्या ऐवजी ते "वडील" होते. आणि त्यांनी एका वयस्कर कृष्णवर्णीय व्यक्तीला बाहेर आणले, आणि त्याच्याकडे या जुन्या पद्धतीचा प्रचारकांचा एक कोट होता. तुम्ही कधी

पाहिला असेल असे मला वाटत नाही. मागच्या बाजूला लांब कबुतराची शेपटी, तुम्हाला माहीत आहे, मखमली कॉलरसह, आणि त्याच्या डोक्याभोवती लहान पांढऱ्या केसाची झालर होती. बिचारा वयस्कर व्यक्ती, तो *असा* बाहेर आला, तुम्हाला माहिती आहे. आणि तो तिथेच उभा राहिला आणि तो मागे फिरला. आणि जिथे सर्व प्रचारक येशू आणि महानता...तो किती महान होता हयाविषयी प्रचार करत होते, आणि असेच पुढे, त्या वयस्कर व्यक्तीने त्याचा विषय ईयोबमधून घेतला. "तू कुठे होतास जेव्हा मी जगाचा पाया घातला, किंवा जेव्हा सकाळचे तारे एकत्र गातात आणि देवाचे पुत्र आनंदाने गजर करतात?"

158 आणि गरीब वृद्ध सहकारी, मला वाटले, "त्यांनी त्यांच्यापैकी काही तरुण व्यक्तीना तेथे प्रचारासाठी का ठेवले नाही?" मस्त...जागा खचाखच भरली होती. आणि मला वाटलं, "त्यांनी असे का केले नाही?"

159 तर मग हा म्हातारा माणूस, इथे पृथ्वीवर काय चालले आहे हे सांगण्याऐवजी, तो सर्व वेळ स्वर्गात काय चालले होते ते प्रचार करू लागला. बरं, सुरुवातीला त्याने त्याला वर घेतले—वेळेच्या सुरुवातीला, आणि दुसऱ्या आगमनाच्या वेळी क्षैतिज मेघधनुष्याच्या खाली त्याला परत आणले. का, असा प्रचार मी माझ्या आयुष्यात कधीच ऐकला नाही! त्याच वेळी आत्मा त्याच्यावर आला, त्याने *एवढ्या* उंचीवर उडी मारली आणि त्याच्या टाचांना एकत्र दाबले, खांदे मागे फेकले आणि त्या प्लॅटफॉर्मवरून चालत गेला, म्हणाला, "मला प्रचार करण्यासाठी तुमच्याकडे इथे पुरेशी जागा नाही." आणि त्याच्याकडे माझ्यापेक्षा जास्त जागा होती.

160 मला वाटले, "जर ते एखाद्या वृद्ध माणसाला असे वागायला लावेल, जर ते माझ्यावर आले तर ते काय करतील?" मला—मला वाटते, "कदाचित मला त्यातल्या काही गोष्टींची गरज आहे." का, तो बाहेर आला, मला त्या म्हाताऱ्या माणसाबद्दल खूप वाईट वाटले. पण, तो गेल्यावर, मला माझ्याबद्दल वाईट वाटत होतं. आणि मी त्याला तिथून निघून जाताना पाहिलं.

161 मी त्या रात्री बाहेर गेलो, आणि मला वाटले, "आता, दुसऱ्या दिवशी सकाळी मी कुठे आहे, कोण आहे हे कोणालाही कळू देणार नाही." म्हणून मी गेलो, आणि त्या रात्री मी माझी विजार इस्त्री केली. मी घेतली...मक्याच्या शेतात झोपायला गेलो, आणि मी खाली जाऊन काही शिळे रोल विकत आणले. आपण...मी त्यांचा संपूर्ण गुच्छ निकेलसाठी विकत घेतला. तेथे खाली एक पाण्याचा नळ होता, मला थोडे पाणी मिळाले. म्हणून मला माहित होते की ते मला थोडा वेळ पुरेल, म्हणून मी माझ्याकरिता थोडे पाणी आणले आणि ते प्यायलो, आणि जाऊन माझे रोल्स खाऊन टाकले. आणि परत येऊन अजून पिण्याचे पाणी घेतले. बाहेर मक्याच्या शेतात गेलो, दोन जागा घेतल्या आणि माझी छोटी सीरसकर विजार तिथे घातली, ती बसण्याच्या जागेवर ठेवली.

162 आणि, त्या रात्री, मी रात्रभर प्रार्थना केली. मी म्हटले, "प्रभु, मी ह्या कशात अडकलो आहे? अशी धार्मिक माणसे मी माझ्या आयुष्यात पाहिली नाहीत." आणि मी म्हणालो, "हे सर्व काय आहे हे जाणून घेण्यासाठी मला मदत कर."

163 आणि दुसऱ्या दिवशी सकाळी मी तिथे उतरलो. आम्हाला नाश्त्यासाठी बोलावले. अर्थात, मी त्यांच्याबरोबर जेवायला येणार नव्हतो, कारण माझ्याकडे अर्पणात टाकण्यासाठी काहीही नव्हते. आणि मी फक्त परत गेलो. आणि दुसऱ्या दिवशी सकाळी जेव्हा मी आत गेलो, का (मी माझे काही रोल्स खाल्ले) आणि खाली बसलो. आणि त्यांच्याकडे मायक्रोफोन होते. आणि मी यापूर्वी कधीही मायक्रोफोन पाहिला नव्हता,

आणि मला त्या गोष्टीची भीती वाटत होती. त्यामुळे ते...आणि त्याला एक छोटीशी दोरी लटकलेली होती, आणि ती खाली लटकत होती. त्यांच्यापैकी एकाने माईक खाली टाकला, असा. आणि तो म्हणाला, "काल रात्री, व्यासपीठावर, येथे एक तरुण प्रचारक होता, एक बाप्टिस्ट."

मला वाटले, "अरे, मी आता कामासाठी चांगला आहे."

164 आणि तो म्हणाला, "व्यासपीठावरील तो सर्वात तरुण प्रचारक होता. त्याचे नाव ब्रॅन्हम होते. त्याचा ठावठिकाणा कोणाला माहीत आहे का? त्याला येण्यास सांगा, त्याने सकाळचा संदेश आणावा अशी आमची इच्छा आहे."

165 अरे देवा! माझ्या अंगावर एक छोटासा टी–शर्ट होता, आणि सीरसकर विजार, तुम्हाला माहित आहे. आणि आम्ही बाप्टिस्ट मानतो की तुम्हाला व्यासपीठावर जाण्यासाठी, सूट घालणे आवश्यक आहे, तुम्हाला माहित आहे. म्हणून...आणि मी—मी अगदी शांत बसलो. आणि त्या काळात...त्यांनी ते त्यावेळी उत्तरेकडे ठेवले होते कारण (त्यांचे आंतरराष्ट्रीय अधिवेशन) जर ते दक्षिणेत ठेवले असते तर कृष्णवर्णीय लोक त्यात येऊ शकत नाहीत. तिथे ते कृष्णवर्णीय होते, आणि मी दक्षिणेचा होतो, माझ्या कॉलरमध्ये अद्याप कडकपणा होता, तुम्हाला समजले, वाटले की मी इतरांपेक्षा थोडा चांगला आहे. आणि त्या दिवशी सकाळी असे घडले, माझ्या अगदी बाजूला एक—एक कृष्णवर्णीय मनुष्य बसला होता. म्हणून मी बसलो आणि त्याच्याकडे पाहिले. मला वाटले, "बरं, तो एक भाऊ आहे."

166 आणि तो म्हणाला, "विल्यम ब्रॅन्हमचा ठावठिकाणा कोणाला माहीत आहे?" मी *अशा प्रकारे* सीटमध्ये घाईघाईने खाली वाकलो. म्हणून तो म्हणाला, दुसऱ्यांदा ती घोषणा केली, म्हणाला, "बाहेर कोणाला" (त्याने हा छोटा माईक आत ओढला) "विल्यम ब्रॅन्हमचा ठावठिकाणा माहीत आहे का? त्याला सांगा की आम्हाला तो सकाळच्या संदेशासाठी व्यासपीठावर हवा आहे. तो दक्षिण इंडियाना येथील बाप्टिस्ट प्रचारक आहे."

167 मी अगदी शांत बसलो आणि चटकन खाली वाकलो, तुम्हाला माहित आहे. तसेही, कोणीही मला ओळखत नव्हते. त्या कृष्णवर्णीय मुलाने माझ्याकडे पाहिले, म्हणाला, "तो कुठे आहे तुला माहीत आहे का?"

168 मला वाटले. मला—मला एकतर खोटे बोलावे लागणार होते किंवा काहीतरी करावे लागणार होते. म्हणून मी म्हणालो, "येथे खाली ये."

तो म्हणाला, "होय, श्रीमान?"

मी म्हटले, "मला तूला काहीतरी सांगायचे आहे." मी म्हटले, "मी—मी तोच आहे."

तो म्हणाला, "बरं, तिथे वर जा."

169 आणि मी म्हणालो, "नाही, मी जाऊ शकत नाही. पहा," मी म्हटले, "मी ही लहान जुनी सीरसकर विजार आणि हा छोटा टी–शर्ट घातला आहे." मी बोललो, "मी तिथे वर जाऊ शकत नाही."

170 तो म्हणाला, "तुम्ही कसे कपडे घालता याची त्यांना पर्वा नाही. तिथे वर जा."

मी बोललो, "नाही, नाही." मी बोललो, "शांत राहा, आता काहीही बोलू नको."

171 आणि ते एका मिनिटाने फोनपाशी परत आले, म्हणाले, "विल्यम ब्रॅन्हमचा ठावठिकाणा कोणाला माहीत आहे?"

172 तो म्हणाला, “इथे तो आहे! इथे तो आहे! इथे तो आहे!” अरे देवा! तिथे मी तो छोटा टी–शर्ट घालून गेलो, तुम्हाला माहित आहे. आणि इथे मी...

173 तो म्हणाला, “वर या, श्रीमान ब्रॅन्हम, तुम्ही संदेश आणावा, अशी आमची इच्छा आहे.” ओह, माझ्या, त्या सर्व प्रचारकांच्या समोर, अरे, ते सर्व लोक! आणि मी वर सरकत गेलो, तुम्हाला माहित आहे. माझा चेहरा लाल झाला, आणि माझे कान जळत आहेत. आणि मी वर गेलो, सीरसकर विजार आणि टी–शर्ट, प्रचारक, बॅप्टिस्ट प्रचारक मायक्रोफोनवर जात आहे, यापूर्वी कधीही पाहिलेला नाही, तुम्ही पहा.

174 आणि मी तिथे उभा राहिलो, मी म्हणालो, “बरं, मी—मी—मला याबद्दल माहिती नाही.” मी गोंधळलो होतो, खरा चिंताग्रस्त होतो, तुम्हाला माहित आहे. आणि—आणि मी येथे लूक 16 मिळाले आहे, आणि मला वाटले, “बरं, आता...” आणि मी—मी विषयाकडे वळलो, “आणि त्याने आपली दृष्टी अधोलोकात वर लावली, आणि हाक मारली.” आणि मला मिळाले...म्हणून मी—मी प्रचार करू लागलो, तुम्हाला माहित आहे, आणि मी प्रचार करायला लागलो आणि मला थोडे बरे वाटले. आणि मी म्हणालो, “हा श्रीमंत मनुष्य अधोलोकात होता, आणि त्याने हाक मारली.” ते छोटे तीन शब्द, जसे माझ्याकडे असे बरेच प्रवचन आहेत, “यावर तुम्ही विश्वास ठेवा,” आणि “खडकाला आज्ञा कर,” तुम्ही मला त्यांचा प्रचार करताना ऐकले आहे. आणि माझ्याकडे होते, “आणि मग त्याने धावा केला.” आणि मी म्हणालो, “तेथे मुले नाहीत, नक्कीच नरकात नाहीत. मग त्याने हाक मारली.” मी बोललो, “तेथे फुले नाहीत. मग त्याने आरोळी मारली. तिथे देव नाही. मग त्याने आरोळी मारली. तेथे ख्रिस्त नाही. त्याने आरोळी मारली.” मग मी रडलो. माझा कशाने तरी ताबा घेतला. खरंच! काय बोलू! नंतर, काय झाले ते मला माहित नाही. जेव्हा मी एक प्रकारे भानावर आलो, तेव्हा मी बाहेर उभा होतो. ते लोक किंचाळीत, ओरडत आणि रडत होते, आणि मी, आमच्यावर खूप भयानक समय होता.

175 मी बाहेर आलो तेव्हा एक व्यक्ती माझ्याकडे टेक्सासची मोठी टोपी, मोठे बूट घालून आला होता. वर आला, म्हणाला, “मी वडील *अमुक–अमुक* आहे.” प्रचारक, गुराख्याचे बूट, गुराख्याचे कपडे घातलेला.

मला वाटले, “बरं, तर मग माझी सीरसकर विजार इतकी वाईट नाही.”

176 म्हणाले, “तुम्ही टेक्सासमध्ये यावे आणि माझ्यासाठी संजीवन करावे अशी माझी इच्छा आहे.”

177 “अहो, मी ते खाली ठेवू द्या, श्रीमान.” आणि मी ते तसे खाली ठेवले.

178 त्यांच्यापैकी एक लहानशी, गोल्फ विजार घातलेला, एक सहकारी येथे आला, जिथे ते गोल्फ खेळायचे, तुम्हाला माहीत आहे, त्यांच्याकडे लहान ब्लाउज पँट होती. तो म्हणाला, “मी मियामीचा येथील वडील *अमुक–अमुक* आहे. मला करायला आवडते...”

179 “माझे, कदाचित पोषाक इतका महत्वाचा नाही.” मी त्याकडे पाहिले, आणि मला वाटले, “ठीक आहे.”

180 म्हणून मी या गोष्टी लक्षात ठेवल्या, आणि मी घरी गेलो. पत्नी मला भेटली, ती म्हणाली, “बिली, तू इतका आनंदी का आहेस?”

181 मी बोललो, “अरे, मला पिकाची मलाई भेटली. खरोखरीच, तु आतपर्यंत पाहिलेल्यांमध्ये हे सर्वोत्तम आहे. या लोकांना त्यांच्या धर्माची लाज वाटत नाही.” आणि,

होय, मी तिला याबद्दल सर्व सांगितले. आणि मी म्हणालो, "आणि इथे पहा, प्रिये, आमंत्रणांची संपूर्ण मालिका. ते लोक!"

ती म्हणाली, "ते देववेडे नाहीत, ते आहेत का?"

182 मी बोललो, "ते कोणत्या प्रकारचे देववेडे आहेत हे मला माहित नाही, परंतु मला आवश्यक असलेले काहीतरी त्यांच्याकडे आहे." समजले? मी बोललो, "त्या—त्या एका गोष्टीची मला खात्री आहे." मी म्हटले, "मी नव्वद वर्षांच्या, एक म्हाताऱ्याला, पुन्हा तरुण होताना पाहिले." मी म्हणालो, "असा प्रचार मी माझ्या आयुष्यात कधीच ऐकला नाही. का, मी बाप्टिस्टला असा प्रचार करताना कधीच पाहिले नाही." मी बोललो, "श्वास सोडेपर्यंत ते प्रचार करतात, आणि गुडघे जमिनीवर टेकतात, परत येतात, त्यांचा श्वास घेतात. तुम्ही त्यांना दोन ब्लॉकनंतर दूर ऐकू शकता, अजूनही प्रचार करत आहे." आणि मी म्हणालो, "मी—मी माझ्या आयुष्यात असे कधीच ऐकले नाही." आणि मी म्हणालो, "ते अज्ञात भाषेत बोलतात, आणि दुसरा ते कशाबद्दल बोलत आहेत ते सांगतात. माझ्या आयुष्यात असे कधीच ऐकले नाही!" मी बोललो, "तू माझ्याबरोबर येशील का?"

183 ती म्हणाली, "प्रिय, जेव्हा मी तुझ्याशी लग्न केले आहे, मी तुझ्याशी जुडुन राहीन जोपर्यंत मृत्यू आपल्याला वेगळे करील." ती म्हणाली, "मी जाईन." ती म्हणाली, "आता, आपण लोकांना सांगू."

184 आणि मी म्हणालो, "बरं, तू तुझ्या आईला सांग आणि मी माझ्या आईला सांगेन." तर आम्ही...मी जाऊन आईला सांगितले.

185 आई म्हणाली, "बरं, नक्कीच, बिली. परमेश्वराने तुला जे काही करायला बोलावले आहे, ते कर."

186 आणि म्हणून श्रीमती ब्रुम्बाचने मला वर येण्यास सांगितले. वर गेलो. ती म्हणाली, "हे तू कशाबद्दल बोलत आहेस?"

187 आणि मी म्हणालो, "होय, श्रीमती ब्रुम्बाच," मी बोललो, "तुम्ही सर्वांनी असे लोक कधीच पाहिले नाहीत."

ती म्हणाली, "शांत बसा! शांत बसा!"

मी बोललो, "हो, बाई." मी बोललो, "मला माफ करा."

आणि ती म्हणाली, "तुम्हाला माहीत आहे का की हा देववेड्या लोकांचा एक समूह आहे?"

188 मी बोललो, "नाही, बाईसाहेब, मला ते माहित नव्हते." मी बोललो, "ते—ते नक्कीच चांगले लोक आहेत."

189 ती म्हणाली, "तेच सांगतेय! तुला असे वाटते का की तु माझ्या मुलीला अशा लोकांमध्ये ओढून नेशील!" म्हणाले, "हास्यास्पद! इतर मंडळींनी फेकलेल्या कचऱ्याशिवाय ते काहीच नाहीत." ती म्हणाली, "खरंच! तू माझ्या मुलीला असं बाहेर काढणार नाहीस."

190 आणि मी म्हणालो, "पण, तुम्हाला माहीत आहे, श्रीमती ब्रुम्बाच, माझ्या अंतःकरणात मला असे वाटते की मी त्यांच्याबरोबर जावे अशी परमेश्वराची इच्छा आहे."

191 ती म्हणाली, "जोपर्यंत ते तुमच्यासाठी निवासस्थान घेऊ शकत नाहीत तोपर्यंत तुम्ही तुमच्या चर्चमध्ये परत जा, आणि अशा मनुष्यासारखे वागा ज्याला काही समज आहे." म्हणाली, "तू माझ्या मुलीला तिथून बाहेर घेऊन जाणार नाहीस."

मी म्हणालो, “हो, बाईसाहेब.” मी मागे वळून बाहेर पडलो.

192 आणि होप रडू लागली. ती बाहेर आली, ती म्हणाली, “बिली, आई काय बोलली याची पर्वा न करता, मी तुझ्याबरोबर राहीन.” तिच्या हृदयाला आशीर्वाद दे!

आणि मी म्हणालो, “अरे, हे सर्व ठीक आहे, प्रिये.”

193 आणि मी फक्त त्याकडे दुर्लक्ष केले. ती आपल्या मुलीला अशा लोकांसोबत जाऊ देणार नाही कारण “ते कचऱ्याशिवाय काही नव्हते.” आणि म्हणून मी फक्त एक प्रकारचे त्याकडे दुर्लक्ष केले. माझ्या आयुष्यात मी केलेली ही सर्वात घोर चूक होती, एक अधिक वाईट.

194 काही काळाने, काही वर्षांनी, मुले झाली. आणि एक दिवस आम्ही होतो...1937 मध्ये, तेथे पूर आला. तेथे पूर आला. आणि आमचे...त्यावेळी मी गस्तीवर होतो आणि पुरातून घरे उध्वस्त झालेल्या लोकांना बाहेर काढण्यासाठी मी सर्वतोपरी प्रयत्न करत होतो. आणि माझी स्वतःची पत्नी आजारी पडली, आणि ती वास्तविक होती, निमोनियाने आजारी होती. आणि त्यांनी तिला बाहेर काढले...नियमित हॉस्पिटल इतके भरले होते की आम्ही तिला तिथे ठेवू शकलो नाही, म्हणून आम्ही तिला बाहेर नेले—सरकारी जिथे त्यांच्याकडे एक खोली होती. आणि मग त्यांनी मला परत बोलावलं. आणि मी नेहमी नदीवर राहत होतो, आणि एक नावाडी, म्हणून मी लोकांपर्यन्त पोहचण्याचा, त्यांना पुरापासून वाचविण्याचा प्रयत्न करत होतो. आणि मग मी...एक...

195 त्यांनी मला बोलावले, म्हणाले, “चेस्टनट स्ट्रीटवर एक घर आहे, ते आत जाण्यासाठी तयार आहे. तिथे एक आई आणि मुलांचा समूह आहे,” म्हणाला, “जर तुम्हाला वाटत असेल की तुमची बोट, तुमची मोटर त्यांच्याकडे जाऊ शकते.”

मी बोललो, “बरं, मी जे काही करू शकतो ते करेन.”

196 आणि मी, त्या लाटा दूर करत. तेथे बंधारा तुटला होता, आणि, ओह, माझे, ... शहर नुसते पाण्याखाली जात होते. आणि मी त्याला शक्य तेवढी मदत करीन, आणि शेवटी गल्ल्या ओलांडून आणि ठिकाणांमधून. आणि मी तिथे पोहोचलो जिथे जुना पुरतट होता, पाणी ओतत होते. आणि मी कोणीतरी ओरडण्याचा आवाज ऐकला, आणि मला एक आई बाहेर व्हरांड्यावर उभी असलेली दिसली. आणि त्यांच्याकडे असे मोठे रोलर्स जात होते. बरं, मी शक्य तितकं *या* मार्गाने वर गेलो, आणि ओढ्यावर प्रहार केला आणि परत आलो आणि त्या बाजूला गेलो. मी माझी बोट खांबाभोवती, खांबाच्या, दरवाजाच्या चौकटीच्या किंवा व्हरांड्याच्या चौकटीभोवती बांधण्यासाठी वेळेत थांबवली होती. आणि मी धावत आत गेलो आणि आईला पकडले, आणि तिला तिथे आणले, आणि दोन–तीन मुलांना. आणि मी माझी बोट पूर्ववत करून तिला घेऊन गेलो...परत. खाली उतरून बाहेर आलो, आणि तिला शहरातून दीड मैल अंतरावर किनाऱ्यावर आणले, मी तिला किनाऱ्यावर पोहोचेपर्यंत. आणि मग मी तिथे पोहोचलो तेव्हा ती बेशुद्ध पडली होती. आणि तिने सुरुवात केली होती...ती ओरडत होती, “माझे बाळ! माझे बाळ!”

197 बरं, मला वाटलं की तिने बाळाला घरात सोडलं होतं. अरे देवा! ते तिची काळजी घेण्याचा प्रयत्न करत असताना मी परत तेथे गेलो. आणि, मी शोधण्यासाठी आलो, ते होते...किंवा तिला तिचं बाळ कुठे आहे हे जाणून घ्यायचं होतं. सुमारे तीन वर्षांचा एक लहान मूल तेथे होत, आणि मला वाटले की तिला एक लहान दूध पिणारे बाळ किंवा काहीतरी आहे.

198 आणि म्हणून मी परत घेतले आणि तिथे पोहोचलो. आणि जेव्हा मी ती बोट पकडली आणि आत गेलो आणि मला बाळ सापडले नाही, आणि व्हरांड्यासह घर वाहून गेले. आणि मी पटकन धावलो आणि तिथला तुकडा—पकडला जेथे माझी बोट तरंगत होती, नावेत चढलो, आणि तो खेचला आणि वर सोडली.

199 आणि त्यामुळे मला मुख्य नदीच्या प्रवाहात बाहेर काढले. आणि रात्रीचे सुमारे साडे–अकरा वाजले होते, आणि गारांची वृष्टी आणि बर्फवृष्टी होत होती. आणि मी स्टार्टरची स्ट्रिंग पकडली आणि मी बोट खेचण्याचा प्रयत्न केला, आणि ती सुरू होत नव्हती, आणि मी प्रयत्न केला, आणि ती सुरू होत नव्हती, आणि मी पुन्हा प्रयत्न केला. त्या प्रवाहात पुढे जाताना, प्रवाह माझ्या अगदी खाली होता. आणि मी खूप प्रयत्न करत होतो, आणि मला वाटले, "अरे, इथे—येथे माझा शेवट आहे! हेच ते!" आणि मी खूप प्रयत्न केला. आणि मी म्हणालो, "प्रभू, मला असे मरू देऊ नकोस," आणि मी खेचत राहिलो आणि मी खेचत राहिलो.

200 आणि ते माझ्याकडे परत आले, "त्या कचऱ्याच्या ढिगाऱ्याचे काय ज्यात तु जाणार नाही?" पहा? उह–हह.

201 मी बोटीवर माझा हात ठेवला, आणि मी म्हणालो, "देवा, माझ्यावर दया कर. मला माझ्या बायकोला आणि बाळाला असे सोडू देऊ नकोस, आणि ते आजारी आहेत! कृपया!" आणि मी असेच खेचत राहिलो, आणि ते सुरू होत नव्हते. आणि मला तिथे गर्जना ऐकू येत होती, कारण मी...फक्त काही मिनिटे, आणि, अरे, माझे, ते तसे होईल. आणि मी म्हणालो, "प्रभु, जर तू मला क्षमा केलीस, तर मी तुला वचन देतो की मी काहीही करीन." तिथे त्या बोटीत गुडघे टेकले, आणि गारांचा पाऊस माझ्या तोंडावर पडत होता. मी बोललो, "तुला माझ्याकडून जे काही करायचे आहे ते मी करेन." आणि मी पुन्हा ओढले, आणि ते सुरू झाले. आणि मी त्यावर जमेल तेवढा गॅस चालू केला, आणि शेवटी किनाऱ्यावर आलो.

202 आणि मी मोटरगाडी, गस्तीसाठीची मोटरगाडी शोधण्यासाठी परत गेलो. आणि मी विचार केला...त्यांच्यापैकी काही जण म्हणाले, "म्हणाले, सरकारी हॉस्पिटल नुकतेच वाहून गेले." तिथे माझी बायको आणि बाळ, दोन्ही बाळं.

203 आणि मी शक्य तितक्या लवकर सरकारी हॉस्पिटलला निघालो, आणि त्यात सुमारे पंधरा फूट खोल पाणी साचले होते. आणि तिथे एक मेजर होता, आणि मी म्हणालो, "मेजर, हॉस्पिटलला काय झालं?"

म्हणाले, "आता, काळजी करू नका. तुमचे तिथे कोणी आहे का?"

मी बोललो, "होय, एक—एक आजारी पत्नी आणि दोन बाळं."

204 तो म्हणाला, "ते सर्व बाहेर पडले." म्हणाले, "ते मालवाहू कारमध्ये आहेत आणि ते चार्ल्सटाउनच्या दिशेने निघाले आहेत."

205 मी धावलो, माझ्या बोटीत बसलो आणि...किंवा माझ्या गाडीत बसलो, आणि माझी बोट तिच्या मागे, आणि तिकडे पळत सुटलो...आणि मग खाड्या सुमारे अडीच ते तीन मैल रुंद खाली आल्या होत्या. आणि रात्रभर मी प्रयत्न केला...त्यापैकी काही म्हणाले, "गाडी, मालवाहू गाडी, तिथल्या रुळांवरून वाहून गेली."

206 बरं, मी स्वतःला एका छोट्या बेटावर पाहिले, तिथे तीन दिवस बसलो. तो कचरा आहे की नाही याचा विचार करण्यासाठी माझ्याकडे भरपूर वेळ होता. फक्त आवाज, "माझी बायको कुठे आहे?"

207 शेवटी जेव्हा मला ती सापडली, काही दिवसात मी बाहेर पडलो आणि ओलांडून गेलो, ती कोलंबस, इंडियाना पर्यंत पोहोचली होती, बाप्टिस्ट ऑडिटोरियममध्ये जिथे त्यांनी एक—एक हॉस्पिटलसारखे बनविले होते, सरकारी खाटांवरचे रूग्णालय. आणि मी शक्य तितक्या वेगाने तिच्याकडे पळत गेलो, ती कुठे आहे हे शोधण्याचा प्रयत्न करत, ओरडत, "होप! होप! होप!" आणि मी पाहिलं, आणि ती तिथे एका खाटेवर पडली होती, आणि टीबी आत गेला होता.

तिने आपला छोटासा हाडकुळा हात वर केला, आणि ती म्हणाली, "बिली."

आणि मी तिच्याकडे धावत गेलो, आणि म्हणालो, "होप, प्रिये."

ती म्हणाली, "मी फार वाईट दिसते, नाही का?"

मी बोललो, "नाही, प्रिये, तू ठीक आहेस."

208 सुमारे सहा महिने आम्ही आमच्यात असलेल्या सर्व गोष्टींसह काम केले, तिचा जीव वाचवण्याचा प्रयत्न केला, पण ती कमजोर आणि कमजोर होत गेली.

209 एके दिवशी मी गस्तीवर होतो आणि मी माझा रेडिओ चालू केला होता, आणि मला वाटले की मी त्यांना बोलताना ऐकले, रेडिओवर कॉल करा, म्हणाला, "विल्यम ब्रॅन्हमसाठी, ताबडतोब हॉस्पिटलमध्ये हवा होता, पत्नी मरत आहे." मी शक्य तितक्या लवकर हॉस्पिटलमध्ये धावलो, लाल दिवा आणि सायरन चालू केला, आणि निघालो. आणि मग मी—मी दवाखान्यात पोहचलो आणि थांबलो, आत धावलो. त्या—त्या हॉस्पिटलमध्ये खाली येत असता, मला माझा एक लहानपणीचा मित्र दिसला आम्ही एकत्र मासेमारी करायचो, आम्ही लहानपणी एकत्र धावायचो, सॅम अडायर.

210 डॉक्टर सॅम अडायर, तो एक आहे ज्याला दृष्टान्त आला होता फार समय झाला नाही आणि त्याला ह्या क्लिनिकबद्दल सांगितले. आणि तो म्हणाला, जर कोणाला दृष्टांतबद्दल शंका असेल तर त्याला फोन करा, तुम्हाला जाणून घ्यायचे आहे की तो बरोबर होता की नाही.

211 आणि मग तो असाच येथे बाहेर आला, आणि त्याच्या हातात त्याची टोपी होती. त्याने माझ्याकडे पाहिले आणि तो फक्त रडू लागला. आणि मी त्याच्याकडे धावलो, माझे हात त्याच्याभोवती टाकले. तो माझ्याभोवती हात ठेवत म्हणाला, "बिली, ती जात आहे." तो म्हणाला, "मला माफ करा. मी जे काही करू शकलो ते मी केले आहे, माझ्याकडे विशेषज्ञ आणि सर्व काही आहे."

मी बोललो, "सॅम, नक्कीच ती जात नाही!"

म्हटले, "होय, ती जात आहे." आणि तो म्हणाला, "बिल, तिथे जाऊ नकोस."

आणि मी म्हणालो, "मला आत जायचे आहे, सॅम."

आणि तो म्हणाला, "ते करू नको. करू नको, कृपया करू नको."

मी बोललो, "मला आत जाऊ द्या."

म्हणाला, "मी तुझ्याबरोबर जाईन."

212 मी बोललो, "नाही, तू इथेच राहा. मला तिच्या शेवटच्या क्षणात तिच्यासोबत राहायचे आहे."

म्हटले, "ती बेशुद्ध आहे."

213 मी खोलीत गेलो. आणि नर्स तिथे बसली होती, आणि ती रडत होती कारण ती आणि होप शाळेत एकत्र होत्या. आणि म्हणून मी वर पाहिले, आणि ती रडायला लागली, तिचा हात वर केला. आणि वर चालू लागलो.

214 आणि मी तिच्याकडे पाहिलं, आणि तिला हलवलं. तिथे ती होती, तिचे वजन सुमारे एकशे वीस पौंडांवरून साठ पर्यंत खाली आले होते. आणि मी—मी तिला हालवले. आणि जर मी शंभर वर्षे जगलो, तर जे घडले ते मी कधीही विसरणार नाही. ती उठली, आणि त्या भल्यामोठ्या सुंदर डोळ्यांनी माझ्याकडे पाहिले. ती हसली. ती म्हणाली, "बिली, तू मला परत का बोलावलेस?"

मी बोललो, "प्रिये, मला नुकतेच पैसे मिळाले आहेत."

215 मला काम करायचे होते. आपण कर्जात बुडालो होतो आणि शेकडो डॉलर्सचे डॉक्टरचे बिल होते, आणि ते देण्यासारखे काहीही नव्हते. आणि मला काम करावे लागत होते. आणि मी तिला दिवसातून दोन-तीन वेळा, आणि रोज रात्री भेटत असे, आणि मग जेव्हा ती त्या अवस्थेत होती.

मी बोललो, "तुला काय म्हणायचे आहे तुला, 'परत' 'बोलावले'?"

216 ती म्हणाली, "बिल, तु याबद्दल प्रचार केला आहे, तु त्याबद्दल बोलला आहेस, परंतु तुला ते काय आहे याची कल्पना नाही."

मी बोललो, "तु कशाविषयी बोलत आहेस?"

217 ती म्हणाली, "स्वर्ग." ती म्हणाली, "पहा," ती म्हणाली, "काही लोक, पुरुष किंवा स्त्रिया किंवा कोणीतरी मला घरी घेऊन जात होते. त्यांनी पांढरे कपडे घातले होते." आणि ती म्हणाली, "मी निश्चिंत आणि शांत होते." म्हणाली, "मोठमोठे सुंदर पक्षी झाडावरुन झाडावर उडत होते." ती म्हणाली, "मी माझ्या बाजूला आहे असे समजू नका." ती म्हणाली, "बिली, मी तुला आपली चूक सांगणार आहे." ती म्हणाली, "खाली बस." मी बसलो नाही; मी गुडघे टेकले, तिचा हात हातात घेतला. ती म्हणाली, "तुला माहीत आहे आपली चूक कुठे आहे?"

आणि मी म्हणालो, "होय, प्रिये, मला माहीत आहे."

218 ती म्हणाली, "आपण आईचे कधीही ऐकायला नको होते. ते लोक बरोबर होते."

आणि मी म्हणालो, "मला माहित आहे."

219 ती म्हणाली, "मला हे वचन दे की तू त्या लोकांकडे जाशील," म्हणाली, "कारण ते बरोबर आहेत." आणि ती म्हणाली, "माझ्या मुलांना तसेच वाढव." आणि मी... ती म्हणाली, "मला तूला काहीतरी सांगायचे आहे." ती म्हणाली, "मी मरत आहे, पण" म्हणाली "ते आहे...मी नाही—मला जाण्याची भीती वाटत नाही." म्हणाली, "ते आहे—ते सुंदर आहे." ती म्हणाली, "फक्त एकच गोष्ट, मला तुला सोडायला आवडत नाही, बिल. आणि मला माहित आहे की तुला ही दोन लहान मुले मोठी करायची आहेत." ती म्हणाली, "मला वचन दे की—की तू अविवाहित राहणार नाहीस आणि माझ्या मुलांची आबाळ होऊ देणार नाहीस." एकवीस वर्षांच्या आईसाठी ही एक समजूतदार गोष्ट होती.

आणि मी म्हणालो, "होप, मी ते वचन देऊ शकत नाही."

220 ती म्हणाली, "कृपया मला वचन दे." म्हणाली, "मला एक गोष्ट सांगायची आहे." म्हणाले, "तुला ती रायफल आठवते?" मला बंदुकींचे फार वेड आहे. आणि ती म्हणाली,

“तुम्हाला त्या दिवशी ती रायफल खरेदी करायची होती आणि बयाना देण्यासाठी तुमच्याकडे पुरेसे पैसे नव्हते.”

मी म्हणालो, “होय.”

221 ती म्हणाली, “मी माझे पैसे, माझे निकल्स वाचवत होती तुमच्यासाठी त्या रायफलवर बयाणा देण्याचा प्रयत्न करण्यासाठी.” ती म्हणाली, “आता, जेव्हा हे संपेल आणि तुम्ही घरी परत जाल, तेव्हा घडी वर...किंवा फोल्डिंग बिछान्यात पहा, त्या वरच्या कागदाच्या तुकड्याखाली, आणि तुम्हाला तेथे पैसे मिळतील.” ती म्हणाली, “मला वचन द्या की तूम्ही ती रायफल विकत घ्याल.”

222 जेव्हा मी ते डॉलर पंचाहत्तर सेंटस (निकेलमध्ये) ठेवलेले पाहिले तेव्हा मला कसे वाटले हे तुम्हाला माहित नाही. मी ती रायफल घेतली.

223 आणि ती म्हणाली, “तुला आठवतंय ती वेळ जेव्हा तू मला पायमोजे विकत घ्यायला खाली बाजारात जात होतास, आणि आपण फोर्ट वेनला जात होतो?”

मी म्हणालो, “होय.”

224 मी मासेमारी करून आलो होतो, आणि ती म्हणाली...आपल्याला फोर्ट वेनला जायचे होते, त्या रात्री मला प्रचार करायचा होता. आणि ती म्हणाली, “तुला माहीत आहे, मी तुला म्हटले, ‘तेथे दोन भिन्न प्रकार आहेत.’” एकाला “शिफॉन” म्हणतात. आणि दुसरे काय आहे, रेयॉन? ते बरोबर आहे का? रेयॉन आणि शिफॉन. बरं, जे असेल, शिफॉन सर्वोत्तम होते. ते बरोबर आहे का? आणि ती म्हणाली, “आता, तुम्ही मला शिफॉन, त्या पूर्ण शैलीचे आणा.” पायमोज्याच्या मागे, वरच्या बाजूस, ती छोटीशी गोष्ट असते हे तुम्हाला माहिती आहे? आणि मला स्त्रियांच्या कपड्यांबद्दल काहीच माहित नव्हते, म्हणून मी...

225 आणि मी रस्त्यावर जात होतो आणि म्हणत होतो, “शिफॉन, शिफॉन, शिफॉन, शिफॉन,” विचार करण्याचा प्रयत्न करीत होतो, “शिफॉन, शिफॉन, शिफॉन.”

कुणीतरी म्हटलं, “हॅलो, बिली!”

226 मी बोललो, “अरे, हॅलो, हॅलो.” “शिफॉन, शिफॉन, शिफॉन, शिफॉन, शिफॉन.”

227 आणि मी कोपऱ्यात आलो आणि श्रीमान स्पॉनला भेटलो. तो म्हणाला, “अहो, बिली, त्या शेवटच्या घाटाच्या बाजूला आता पर्च मासे चावत आहेत हे तुला माहीत आहे का?”

मी बोललो, “नक्कीच, ते खरे आहे का?”

“होय.”

मी त्याला सोडल्यावर, आता विचार करू लागलो, “ती सामग्री काय होती?” मी ते विसरलो.

228 तर थेल्मा फोर्ड, माझ्या ओळखीची मुलगी, दहा सेंटवर स्टोअरमध्ये काम करत होती. आणि मला माहित होते की ते तिथे महिलांचे पायमोजे विकतात, म्हणून मी गेलो. मी बोललो, “हाय, थेल्मा.”

आणि ती म्हणाली, “हाय, बिली. तू कसा आहेस? होप कशी आहे?”

229 आणि मी म्हणालो, “ठीक आहे.” मी बोललो, “थेल्मा, मला होपसाठी पायमोज्यांची जोडी हवी आहे.”

ती म्हणाली, “होपला मोजे नकोत.”

मी बोललो, “होय, मॅडम, तिला नक्कीच हवेत.”

म्हटले, “तुम्हाला पायमोजे म्हणायचे आहे.”

230 “हो जरूर,” मी बोललो, “तेच आहे.” मला वाटते, “अरेरे, मी माझे अज्ञान दाखवले.”

आणि ती म्हणाली, “तिला कोणत्या प्रकारचे हवेत?”

मला वाटते, “अरेरे!” मी बोललो, “तुमच्याकडे कोणत्या प्रकारचे आहेत?”

ती म्हणाली, “बरं, आमच्याकडे रेयॉन आहेत.”

231 मला फरक कळला नाही. रेयॉन, शिफॉन, हे सर्व सारखेच आहे. मी बोललो, “तेच तर मला पाहिजे आहे.” ती म्हणाली...मी बोललो, “मला त्यांच्यापैकी एक जोडी निश्चित करा, पूर्ण शैली.” आणि ती...मी ती चुकीची आणली. हे काय आहे? पूर्ण फॅशन. “पूर्ण फॅशन.” आणि म्हणून मी म्हणालो, “मला त्यांची एक जोडी द्या.”

232 आणि जेव्हा ती मला द्यायला गेली, ते फक्त तीस सेंट, वीस सेंट किंवा तीस सेंट, सुमारे अर्धी किंमत होती. बरं, मी म्हटलं, “मला त्यांच्या दोन जोड्या द्या.” पहा?

233 आणि मी घरी परतलो, आणि मी म्हणालो, “तुला माहित आहे, प्रिये, तूम्ही स्त्रिया स्वस्त खरेदी करण्यासाठी शहरभर खरेदीसाठी फिरता.” तुम्हाला माहीत आहे तुम्हाला कसे ते करणे आवडते. आणि मी म्हणालो, “पण इथे, इथे बघ, तुम्ही एक जोडी खरेदी करता त्या किंमतीला मी दोन जोडया विकत घेतल्या. पहा?” मी बोललो, “अरे, ते आहे—ती माझी वैयक्तिक क्षमता आहे.” बघ, मी म्हणालो—मी बोललो, “तुला माहीत आहे, थेल्माने मला हे विकले.” मी बोललो, “तिने मला ते अर्ध्या किमतीत घेऊ दिले असावे.”

ती म्हणाली, “तुम्हाला शिफॉन मिळाले का?”

234 मी बोललो, “हो, बाई.” हे सर्व मला सारखेच वाटले, मला माहित नव्हते की यात काही फरक आहे.

235 आणि तिने मला सांगितले, ती म्हणाली, “बिली.” जेव्हा ती फोर्ट वेनला गेली तेव्हा मला विचित्र वाटले, तिला स्टॉकिंग्जची दुसरी जोडी घ्यावी लागली. ती म्हणाली, “मी ते तुझ्या आईला दिले,” म्हणाली, “ते वृद्ध महिलांसाठी आहेत.” म्हटले, “मला माफ करा मी ते केले.”

आणि मी म्हणालो, “अरे, हे सर्व ठीक आहे, प्रिये.”

236 आणि ती म्हणाली, “आता, नको—अविवाहित राहू नको.” आणि ती म्हणाली... त्यानंतर काही तासांत काय घडणार आहे हे तिला माहीत नव्हते. आणि देवाचे देवदूत तिला घेऊन जात असताना मी तिचे प्रिय हात धरले.

237 मी घरी गेलो. मला काय करावं कळत नव्हतं. मी रात्री तिथेच पडलो आणि मी ऐकले...मला वाटतं तो एक छोटा उंदीर होता, जुन्या शेगडीत होता जिथे आमच्याकडे काही कागद होते. आणि मी पायाने दार बंद केले, आणि तिचा अंगरखा पाठीमागे टांगला, (आणि त्या शवागारात पडून राहिलो). आणि थोड्याच वेळात कोणीतरी मला हाक मारली, म्हणाले, “बिली!” आणि तो भाऊ फ्रँक ब्रॉय होता. तो म्हणाला, “तुमचे बाळ मरत आहे.”

मी बोललो, “माझे बाळ?”

238 म्हणाले, “होय, शेरॉन रोज.” म्हणाले, “डॉक्टर आता तिथे आले आहेत, आणि म्हणाला, ‘तिला ट्यूबरक्युलर मेंनिंजायटीस झाला आहे, तिला तिच्या आईकडून त्याची लागण झाली.’” आणि म्हणाले, “ती मरत आहे.”

239 मी गाडीत बसलो, तिथे वर गेलो. आणि ती तिथे होती, गोड छोटी गोष्ट. आणि त्यांनी तिला तातडीने रुग्णालयात नेले.

240 मी त्याला भेटायला बाहेर गेलो. सॅम वर आला आणि म्हणाला, “बिली, तू त्या खोलीत जाऊ नकोस, तुला बिली पॉलचा विचार करावा लागेल.” म्हणाले, “ती मरत आहे.”

मी बोललो, “डॉक्टर, मला—मला माझ्या मुलीला भेटले पाहिजे.”

241 तो म्हणाला, “नाही, तुम्ही आत जाऊ शकत नाही.” म्हणाले, “बिली, तिला मेंदुज्वर झाला आहे, आणि तुम्ही ते बिली पॉलकडे न्याल.”

242 आणि तो बाहेर येईपर्यंत मी थांबलो. तिला मरताना पाहण्यासाठी मी उभा राहू शकलो नाही, आणि तिची आई तिथे दफणविधीची व्यवस्था पाहणाऱ्या आस्थापनात पडून आहे. मी तुम्हांला सांगतो, अपराध्याचा मार्ग कठीण आहे. आणि मी—मी गेलो, दारात गेलो, आणि जेव्हा सॅम बाहेर गेला आणि नर्स बाहेर गेली, तेव्हा मी तळघरात गेलो. हे छोटेसे हॉस्पिटल आहे. ती एका निर्जन ठिकाणी होती, आणि तिच्या छोट्या डोळ्यात माश्या होत्या. आणि त्यांच्याकडे थोडे होते...ज्याला आपण म्हणतो “मच्छर बार,” किंवा तिच्या डोळ्यांवर लहानशी जाळी. आणि तिने...थोडी आकडी, तिचा छोटा लठ्ठ पाय तसाच वर–खाली फिरत होता, आणि तिचे छोटे हात, त्या आकडीमूळे. आणि मी तिच्याकडे पाहिले, आणि ती गोंडस होण्याइतकी मोठी होती, सुमारे आठ महिन्यांची.

243 आणि तिची आई तिला तिथं तिथं तिथल्या छोट्या तीन कोपऱ्यांवर ठेवायची, तुम्हाला माहित आहे, अंगणात, जेव्हा मी वर येई. आणि मी शिंग फोडले आणि ती जाई, “गू–गू, गू–गू,” माझ्यापर्यंत पोहोचण्यासाठी, तुम्हाला माहिती आहे.

244 आणि तेथे माझी प्रिय, मरत होती. मी तिच्याकडे पाहिले, आणि म्हणालो, “शॅरी, तुला माहित आहे बाबा? शॅरी, तुला डॅडी माहीत आहे का?” आणि जेव्हा तिने पाहिले... त्यातला एक सुंदर निळे डोळे बंद होईपर्यंत तिला खूप त्रास होत होता. जणूकाही माझ्याकडून माझे हृदय फाटत होते.

245 मी गुडघे टेकले, मी म्हणालो, “प्रभु, मी काय केले? मी रस्त्याच्या कोपऱ्यांवर शुभवर्तमानाचा प्रचार केला नाही का? मला जे करण्याचे माहीत होते ते सर्व मी केले आहे. ते माझ्याविरुद्ध धरू नकोस. मी त्या लोकांना कधीच ‘कचरा’ म्हटले नाही. तिनेच त्या लोकांना ‘कचरा’ म्हटले.” मी बोललो, “मला खेद आहे की हे सर्व घडले. मला माफ कर. घेऊ नकोस—माझ्या बाळाला घेऊ नकोस.” आणि मी प्रार्थना करत असताना, काळ्यासारखे दिसले...चादर किंवा कापड खाली आले. मला माहित होते की त्याने मला नकार दिला होता.

246 आता, माझ्या आयुष्यातील सर्वात कठीण आणि सर्वात धोकादायक काळ होता. जेव्हा मी उठून तिच्याकडे पाहिले, आणि मला वाटले...सैतानाने माझ्या मनात घातले, “बरं, तुला म्हणायचे आहे की तु इतका कठोर प्रचार केला आणि तु ज्या प्रकारे जगला, आणि आता जेव्हा तुझ्या स्वतःच्या बाळाचा प्रश्न आला, तेव्हा तो तुला नाकारील?”

247 आणि मी म्हणालो, “ते बरोबर आहे. जर तो माझ्या मुलीला वाचवू शकत नसेल तर मी करू शकत नाही...” मी थांबलो. मला—मला फक्त काय करावे हे कळत नव्हते.

आणि मग मी हे बोललो, मी म्हणालो, “परमेश्वरा, तू तिला मला दिलेस आणि तू तिला काढून घेतलेस, परमेश्वराचे नाव धन्य असो! जर तू मलाही घेतलेस, तरीही मी तुझ्यावर प्रेम करेन.”

248 आणि मी तिच्या अंगावर माझा हात ठेवत, म्हणालो, “तुला आशीर्वाद देवो, प्रिये. डॅडीला तुला वाढवायचे होते, मला मनापासून तुला वाढवायचे होते, आणि परमेश्वरावर प्रेम करण्यासाठी तुला वाढवायचे होते. पण देवदूत तुझ्यासाठी येत आहेत, प्रिये. डॅडी तुझे लहान शरीर खाली घेऊन आईच्या हातावर ठेवतील. मी तुला तिच्याबरोबर दफन करीन. कधीतरी बाबा तुला भेटतील, तू तिथे आई बरोबर वाट पहा.”

249 जेव्हा तिची आई मरत होती, तेव्हा ती म्हणाली, शेवटचे शब्द तिने सांगितले, ती म्हणाली, “बिल, कार्यक्षेत्रावर राहा.”

250 मी बोललो, “मी करेन...” ती म्हणाली...मी बोललो, “तो आल्यावर मी कार्यक्षेत्रात असलो, तर मी मुलांना घेऊन भेटेन. मी नसल्यास, मला तुमच्या बाजूला पुरले जाईल. आणि तुम्ही मोठ्या दाराच्या उजव्या बाजूने पलीकडे जा, आणि जेव्हा तुम्ही ते सर्व आत आलेले पाहाल, तिथे उभे राहा आणि ओरडायला सुरुवात करा, ‘बिल! बिल! बिल!’ तुम्ही शक्य तितक्या मोठ्याने. मी तुम्हाला तिथे भेटेन.” मी तिचा निरोप घेतला. मी आज रणांगणावर आहे. जवळपास वीस वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. मला माझ्या पत्नीसोबत बाहेर जाण्यास मिळणार आहे, मी तिला भेटणार आहे.

251 आणि मी त्या लहान मुलीला घेतले, जेव्हा ती मेली, आणि आईच्या हातांवर ठेवले, आणि आम्ही ते दफनभूमीत नेले. आणि अंत्यसंस्काराचा प्रचार करणारे मेथोडिस्ट प्रचारक, बंधू स्मिथ यांना ऐकण्यासाठी मी तिथे उभा राहिलो, “राख राखेला आणि धूळ धुळीला.” (आणि मला वाटले, “हृदय हृदयाकडे.”) ती तिथे गेली.

252 त्यानंतर थोड्याच वेळात, मी एका सकाळी छोट्या बिलीला घेऊन गेलो. तो फक्त छोटासा मुलगा होता. तो...

253 त्यामुळेच तो माझ्याशी चिकटून राहतो आणि मी त्याच्यासोबत राहतो, मला त्याच्यासाठी पापा आणि मामा (दोघेही) व्हायचे होते. मी त्याची छोटी बाटली घेत असे. त्याचे दूध गरम ठेवण्यासाठी रात्री आग लावणे आम्हाला परवडणारे नव्हते, आणि मी ते माझ्या पाठीखाली ठेवीत असे आणि माझ्या शरीराच्या उष्णतेने ते उबदार ठेवीत असे.

254 आम्ही मित्रांसारखे एकत्र रुतलो होतो, आणि यापैकी एक दिवस जेव्हा माझी सेवकाई समाप्त होणार तेव्हा मला त्याला देवाचे वचन सोपवायचे आहे, आणि म्हटले, “जा, बिली. तु त्याच्यासोबत रहा.” काही लोक आश्चर्यचकित करतात की मी त्याला सतत माझ्यासोबत का ठेवले. मी त्याला सोडू शकत नाही. त्याचे लग्न झाले आहे, पण मला अजूनही आठवते की तिने मला सांगितले होते, “त्याच्यासोबत राहा.” आणि आम्ही मित्रांसारखे एकत्र बांधलेलो आहोत.

255 मला आठवते की शहरात फिरताना, माझ्या हाता त्याची बाटली सदैव असे, तो रडत असे. एके रात्री तो...आम्ही बाहेरच्या अंगणात फिरत होतो...(जेव्हा तो होणार होता, तेव्हा ती चिडत होती, आणि मी...तेव्हा ती एक मुलगी होती, तुम्हाला माहित आहे.) आणि मी अंगणाच्या मागील बाजूस असलेल्या जुन्या ओकच्या झाडाकडून मागे–पुढे जात असे. आणि तो त्याच्या आईसाठी रडत होता, आणि माझ्याकडे त्याला घेऊन जाण्यासाठी कोणतीही आई नव्हती. आणि मी त्याला समजावीत असे, मी म्हणे, “अरे, प्रिये.” मी बोललो...

256 तो म्हणाला, “बाबा, माझी आई कुठे आहे? तू तिला त्या जमिनीत टाकलंस का?”

मी बोललो, “नाही प्रिये. ती ठीक आहे, ती स्वर्गात आहे.”

257 आणि तो तिथे काहीतरी म्हणाला, एका दुपारी, स्वतःला मारून टाकावे असे वाटले. तो रडत होता, संध्याकाळी उशीरापर्यन्त होता, आणि मी त्याला *अशाप्रकारे* माझ्या पाठीवर बांधून नेत होतो, त्याला माझ्या खांद्यावर बांधले आणि त्याला *असे* थोपटले. आणि तो म्हणाला, “बाबा, प्लीज ममाला घेऊन या आणि तिला इथे घेऊन या.”

आणि मी म्हणालो, “बाळा, मी आईला आणू शकत नाही. येशू...”

म्हणाले, “बरं, येशूला सांग माझ्या आईला माझ्याकडे पाठव. मला ती हवी आहे.”

258 आणि मी म्हणालो, “बरं, बाळा, मी...मी आणि तू तिला कधीतरी भेटायला जाऊ.”

आणि तो थांबला, म्हणाला, “बाबा!”

आणि मी म्हणालो, “होय?”

म्हणाला, “त्या ढगावर मी ममाला पाहिले.”

259 खरंच, मला मरावेसे वाटले! मला वाटले, “मी काय करू! ‘त्या ढगावर मी ममाला पाहिले.’” माझी ताकद संपल्यासारखे झाले. मी त्या छोट्या मूलाला *अशा प्रकारे* माझ्या मिठीत उराशी घेतले, आणि माझे डोके खाली धरून, आत गेलो.

260 दिवस भरत गेले. मी ते विसरू शकलो नाही. मी काम करण्याचा प्रयत्न केला. घरी परत जाऊ शकलो नाही, ते आता घर नव्हते. आणि मला राहायचे होते. आमच्याकडे फक्त त्या जुन्या तुटलेल्या फर्निचरशिवाय काहीही नव्हते, परंतु ते असे काही होते की ती आणि मी एकत्र आनंदाने राहत होतो. ते घर होते.

261 आणि मला आठवते की एके दिवशी मी सार्वजनिक सेवेत काम करण्याचा प्रयत्न करत होतो. मी जुनी दुय्यम तार दुरुस्त करण्यासाठी वर गेलो होतो, जी खाली लटकत होतो, ती खरोखर पहाटेची वेळ होती. आणि मी ह्या लोखंडच्या कैचीवर चढलो. (आणि मी मनांतून त्या मुलीला विसरू शकत नव्हतो. मी माझ्या बायकोला जाताना पाहू शकत होतो, पण त्या मुलीला जाताना, अगदी एक छोटीशी बाळ.) आणि मी तिथे होतो, आणि मी गात होतो, “दूर टेकडीवर, एक जुना दगडी क्रूस उभा आहे.” आणि त्याच वेळी वीज प्राइमरी ट्रान्सफॉर्मरपर्यंत आली आणि (तुम्हाला माहित आहे) नंतर दुय्यम मध्ये आली. आणि मी तिथेच त्यावर काम करीत होतो. आणि माझ्या नजरेस आले, आणि सूर्य माझ्या मागे येत आहे. आणि तिथे, माझे हात पसरले आणि त्या क्रुसाचे चिन्ह त्या—त्या टेकडीवर आहे. मला वाटले, “होय, माझ्या पापांनी त्याला तेथे ठेवले.”

262 मी बोललो, “शेरॉन, प्रिये, डॅडीला तुला खूप भेटण्याची इच्छा आहे. प्रिये, मी तुला पुन्हा माझ्या हातात कसे धरू इच्छितो.” तिच्या मृत्यूला काही आठवडे झाले होते, मी माझ्या विचारांमध्ये गुंग होतो. मी माझा रबरचा हातमोजा काढला. माझ्या बाजूला तेवीसशे व्होल्ट्स विजेचा प्रवाह चालू होता. मी माझा रबरचा हातमोजा काढला. मी बोललो, “देवा, मला हे करणे आवडत नाही. मी एक भित्रा आहे.” “पण, शॅरी, डॅडी काही मिनिटांत तुला आणि आईला भेटणार आहे.” त्या तेवीसशे विजेच्या प्रवाहावर हात ठेवण्यासाठी, माझा हातमोजा काढू लागलो. तो खंडित होईल...का, तुमच्यात रक्तही शिल्लक राहणार नाही. आणि म्हणून मी—मी—मी तो हातमोजा काढायला सुरुवात केली, आणि काहीतरी घडले. जेव्हा मी भानावर आलो, तेव्हा मी जमिनीवर *अशा प्रकारे* चेहऱ्यावर, हात करून, रडत बसलो होतो. ही देवाची कृपा होती, अन्यथा मी येथे ही

आरोग्य सभा आयोजित करू शकलो नसतो, मला याची खात्री आहे. तो त्याच्या देणगीचे रक्षण करीत होता, मी नाही.

263 मी घरी जाऊ लागलो. मी निघालो, माझी साधने दूर ठेवली. आणि परत गेलो, मी म्हणालो, "मी घरी जात आहे."

264 मी घराभोवती फिरू लागलो, आणि मी घरात एक पत्र उचलले, एक प्रकारे थंड, आणि मी आत गेलो. आमच्याकडे एक छोटीशी खोली होती, मी तिथे एका छोट्या कॉटवर झोपलो होतो, आणि दंव वर येत होते, आणि तो जुना स्टोव्ह. मी पत्र घेतले आणि मी पत्रा मध्ये पाहिले, आणि तिथे पहिली गोष्ट होती तिची लहान ख्रिसमस बचत, ऐंशी सेंट, "मिस शेरॉन रोझ ब्रॅन्हम." तेथे ते होते, पुन्हा सगळे संपले.

265 मी गेम वॉर्डन होतो. मी तिथे पोहोचलो आणि माझी बंदूक, पिस्तूल, कातडी पिशवितून बाहेर काढली. मी बोललो, "प्रभु, मी—मी यापुढे जाऊ शकत नाही, मी आहे—मी मरत आहे. मला—मला खूप त्रास होत आहे." मी बंदुकीवर हातोडा मागे खेचला, माझ्या डोक्यावर ठेवला, त्या अंधाऱ्या खोलीत त्या कॉटवर गुडघे टेकले. मी म्हणालो, "आमचा पिता जो स्वर्गात आहे, तुझे नाव पवित्र मानले जावो. तुझे राज्य येवो, तुझ्या इच्छेप्रमाणे होवो," आणि जसा मी प्रयत्न केला, आणि मी शक्य तितक्या जोरात तो बंदुकीचा चाप दाबला, मी म्हटले, "जसे स्वर्गात तसे पृथ्वीवर होवो. या दिवशी आम्हाला आमची रोजची भाकरी दे." आणि बंदूक चालू झाली नाही!

266 आणि मला वाटले, "हे देवा, तू अगदी माझे तुकडे करतोस का? मी काय केले आहे? तू मला मरूही देणार नाहीस." आणि मी बंदूक खाली फेकली, आणि ती निघून गेली आणि खोलीतून गोळी बाहेर निघाली. मी बोललो, "देवा, मी का मरून त्यातून बाहेर पडू शकत नाही? मी ह्या पुढे जाऊ शकत नाही. तुला माझ्यासाठी काहीतरी करावे लागेल." आणि मी पडलो आणि तिथे माझ्या लहान, जुन्या गलिच्छ अंथरूणावर रडू लागलो.

267 आणि मी झोपी गेलेलो असावा. मला कळत नाही की मी झोपलो होतो की काय झाले.

268 मला नेहमीच पश्चिमेच्या दिशेने बाहेर जाण्याची इच्छा होती. मला नेहमीच त्यांच्यापैकी एक टोपी हवी होती. माझे वडिल त्यांच्या तरुणपणी घोड्यांचे दलाल होते, आणि मला नेहमी त्यांच्यापैकी एक टोपी हवी होती. आणि बंधू डेमोस शकरियन यांनी काल मला तशा प्रकारची एक टोपी विकत आणली होती, माझ्याकडे अशी पहिल्यांदा त्यापैकी एक प्रकारची पश्चिमी टोपी (कधीही) होती.

269 आणि मला वाटले की मी गवताळ प्रदेशांतून खाली जात आहे, ते गाणे गात, "मालगाडीचे एक चाक तुटलेले आहे, जे गाडी 'विक्रीसाठी आहे'" ह्याचे चिन्ह आहे. आणि मी पुढे जात असताना, मला एक जुनी झाकलेली मालगाडी दिसली, जुन्या गवताळी पढे मागे शीड असलेल्या जहाजा सारखी, आणि त्याचे चाक तुटले होते. अर्थात, ते माझ्या तुटलेल्या कुटुंबाचे दर्शक होते. आणि जसा मी जवळ गेलो, मी पाहिले, आणि तिथे एक—एक अंदाजे वीस वर्षांची, खरी सुंदर, तरुण मुलगी उभी होती, पांढरे वाढलेले केस आणि निळे डोळे, पांढरे कपडे घातलेली. मी तिच्याकडे पाहिलं, मी म्हटले, "तु कशी आहेस?" पुढे गेलो.

ती म्हणाली, "हॅलो, डॅड."

270 आणि मी मागे वळून म्हणालो, "डॅड?" "काय," मी बोललो, "मिस, तु कशी असू शकते...जेव्हा तु माझ्याइतकीच मोठी असता मी तुझा डॅडी कसा होऊ शकतो?"

271 ती म्हणाली, “डॅडी, तुम्ही कुठे आहात हे तुम्हाला माहीत नाही.”

आणि मी म्हणालो, “तुला काय म्हणायचे आहे?”

272 ती म्हणाली, “हा स्वर्ग आहे.” म्हणाली, “पृथ्वीवर मी तुझी छोटी शेरॉन होती.”

“काय,” मी बोललो, “प्रिये, तू अगदी लहान बाळ होतीस.”

273 म्हणाली, “डॅडी, लहान बाळं इथे लहान बाळ नाहीत, ते अमर आहेत. ते कधी म्हातारे होत नाहीत किंवा वाढतही नाही.”

274 आणि मी म्हणालो, “बरं, शेरॉन, प्रिये, तू—तू एक सुंदर, तरुण स्त्री आहेस.”

ती म्हणाली, “आई तुझी वाट पाहत आहे.”

आणि मी म्हणालो, “कुठे?”

ती म्हणाली, “वर तुमच्या नवीन घरी.”

275 आणि मी म्हणालो, “नवीन घर?” ब्रॅन्हम हे भटके आहेत, त्यांना घरे नाहीत, ते फक्त...आणि मी म्हणालो, “बरं, माझ्याकडे कधीच घर नव्हतं, प्रिये.”

276 ती म्हणाली, “डॅडी, पण इथे वर तुमचे एक आहे.” मला बाळ व्हायचे नाही, पण ते माझ्यासाठी इतके खरे आहे. [भाऊ ब्रॅन्हम रडतात—संपा.] मी याचा विचार करू लागलो की, हे सर्व परत मिळते. म्हणाली, “तुमच्याकडे येथे एक आहे, डॅडी.” मला माहित आहे की माझे तिथे एक आहे, एके दिवशी मी तिथे जाईन. ती म्हणाली, “माझा भाऊ, बिली पॉल कुठे आहे?”

277 आणि मी म्हणालो, “बरं, मी त्याला काही मिनिटांपूर्वी मिसेस ब्रॉयच्या घरी सोडलं.”

म्हणाले, “आईला तुला भेटायच आहे.”

278 आणि मी वळून पाहिलं, आणि तिथे मोठे मोठे राजवाडे होते, आणि त्यांच्याभोवती देवाचे तेज दिसत होते. आणि मी देवदूतांच्या समूहाला गाताना ऐकले, “माझे घर, मधुर घर.” मी जमेल तितक्या वेगाने धावत लांब पावले टाकीत जायला सुरुवात केली. आणि जेव्हा मी दारापाशी पोहोचलो, तेव्हा ती तिथे उभी होती, पांढरे कपडे घातलेले, काळे केस, लांब, तिला मागे धरून होते. तिने हात वर केले, जसे ती नेहमी करीत असे जेव्हा मी कामावरून किंवा कशानेही थकून घरी यायचो. मी तिला हाताने पकडले, आणि म्हणालो, “प्रिये, मी शेरॉनला तिथे पाहिले.” मी बोललो, “ती एक सुंदर मुलगी झाली आहे, ती नाही का?”

279 ती म्हणाली, “होय, बिल.” ती म्हणाली, “बिल.” तिचे हात माझ्याभोवती ठेवले, (आणि ती म्हणाली) फक्त माझ्या खांद्याभोवती, ती मला थोपवू लागली, ती म्हणाली, “माझी आणि शेरॉनची काळजी करणे थांबवा.”

मी म्हणालो, “प्रिये, मी ते थांबवू शकत नाही.”

280 ती म्हणाली, “आता शेरॉन आणि मी तुमच्यापेक्षा चांगले आहोत.” आणि म्हणाले, “यापुढे आमची काळजी करू नका. तू मला वचन देशील का?”

281 आणि मी म्हणालो, “होप,” मी म्हणालो, “मला तुझ्यासाठी आणि शेरॉनसाठी खूप एकटेपणा जाणवत आहे, आणि बिली तुझ्यासाठी नेहमीच रडत असतो.” मी म्हटले, “त्याला काय करावे हे मला कळत नाही.”

282 आणि ती म्हणाली, "ते सर्व ठीक होईल, बिल." ती म्हणाली, "फक्त मला वचन दे की तू आता काळजी करणार नाहीस." आणि ती म्हणाली, "तु बसणार नाहीस का?" आणि मी आजूबाजूला पाहिले तर एक भली मोठी खुर्ची होती.

283 आणि मला आठवते की मी एक खुर्ची विकत घेण्याचा प्रयत्न केला होता. आता, समाप्त करीत असता. मी एकदा खुर्ची विकत घेण्याचा प्रयत्न करीत होतो. आमच्याकडे फक्त त्या जुन्या—त्या जुन्या सामान्य लाकडी खुर्च्या ब्रेकफास्ट सेटसाठी होत्या. आम्हाला त्या वापराव्या लागत होत्या, फक्त त्याच खुर्च्या आमच्याकडे होत्या. आणि आम्ही यापैकी एक खुर्ची विकत घेऊ शकतो जी तुम्ही मागे सोडू शकता, जसे की... आरामशीर खुर्ची कोणत्या प्रकारची आहे हे मी विसरलो. आणि त्याची किंमत सतरा डॉलर्स होती, आणि तुम्ही तीन डॉलर सुरुवातीला आणि आठवड्याला एक डॉलर देऊ शकता. आणि आम्हाला एक मिळाली. आणि, अरे, जेव्हा मी आत येई...मी दिवसभर काम करायचो, आणि मध्यरात्रीपर्यंत रस्त्यावर आणि जिथे मला प्रचार करता येईल तिथे प्रचार करायचो.

284 आणि—आणि एके दिवशी मी माझा हप्ता देण्यात कमी पडलो. आम्ही ते देऊ शकलो नाही, आणि ते दिवसेंदिवस वाढत गेले, आणि शेवटी एके दिवशी त्यांनी येऊन माझी खुर्ची घेतली आणि ती घेतली. ती रात्र, मी कधीही विसरणार नाही, तिने माझ्यासाठी चेरी पाई बनविली होती. गरीब लहान जुनी गोष्ट, ती—ती—तिला माहित होते की मी निराश होणार आहे. आणि रात्रीच्या जेवणानंतर मी म्हणालो, "प्रिये, आज रात्री तुला काय चांगले वाटत आहे?"

285 आणि ती म्हणाली, "म्हणाली, मी तुमच्या शेजारच्या मुलांना काही मासेमारीसाठी गांडूळ खणायला लावले होते. आपण नदीवर जाऊन थोडावेळ मासेमारी केली पाहिजे असे वाटत नाही का?"

आणि मी म्हणालो, "हो, पण..."

286 आणि ती रडू लागली. काहीतरी गडबड आहे हे मला माहीत होतं. मला एक कल्पना होती कारण त्यांनी मला आधीच नोटीस पाठवली होती की ते ती घेण्यासाठी येत आहेत. आणि आम्ही आठवड्याचे ते डॉलर पेमेंट करू शकलो नाही. आम्ही करू शकलो नाही, नाही...ते परवडत नव्हते. तिने तिचे हात माझ्याभोवती ठेवले, आणि मी दारात गेलो आणि माझी खुर्ची घेऊन गेले होते.

तिने मला तिथे वर सांगितले, ती म्हणाली, "तुला ती खुर्ची आठवते, बिल?"

आणि मी म्हणालो, "होय, प्रिये, मला आठवते."

म्हणाले, "तुम्ही याचाच विचार करत होता, नाही का?"

"होय."

287 म्हणाली, "बरं, ते ही घेणार नाहीत, यासाठी पैसे दिलेले आहेत." ती म्हणाली, "जरा एक मिनिट बसा, मला तुमच्याशी बोलायचे आहे."

आणि मी म्हणालो, "प्रिये, मला हे समजले नाही."

288 आणि ती म्हणाली, "मला वचन दे, बिली, मला वचन दे की तू आता काळजी करणार नाहीस. तुम्ही आता परत जात आहात." आणि म्हणाली, "मला वचन दे की तू काळजी करणार नाहीस."

आणि मी म्हणालो, "मी ते करू शकत नाही, होप."

289 आणि तेवढ्यात मी आलो, खोलीत अंधार पडला होता. मी आजूबाजूला पाहिले आणि मला तिचा हात माझ्याभोवती जाणवला. मी म्हटले, “होप, तू इथे खोलीत आहेस का?”

290 ती मला थोपटायला लागली. ती म्हणाली, “तू मला ते वचन देणार आहेस, बिल? मला वचन दे तू लग्न करणार नाहीस…अधिक काळजी करणार नाहीस.”

मी म्हटले, “मी तुला वचन देतो.”

291 आणि मग तिने मला दोन तीन वेळा थोपटले, आणि ती निघून गेली होती. मी उडी मारली आणि लाईट चालू केली, सर्वत्र पाहिले, ती गेली होती. पण ती नुकतीच खोलीबाहेर गेली. ती गेली नाही, ती अजूनही जिवंत आहे. ती ख्रिस्ती होती.

292 बिली आणि मी काही समयापूर्वी इथे थडग्याकडे गेलो होतो, त्याच्या आई आणि बहिणीसाठी एक छोटेसे फूल घेऊन, फक्त एका इस्टर सकाळी, आणि आम्ही थांबलो. हा लहान मुलगा रडायला लागला, तो म्हणाला, “बाबा, माझी आई तेथे खाली आहे.”

293 मी बोललो, “नाही, प्रिय. नाही, ती तिथे खाली नाही. बहीण तेथे खाली नाही. आपल्याला येथे कबरीवर एक दुमडलेला भाग आहे, परंतु समुद्राच्या पलीकडे एक उघडी कबर आहे जिथे येशू उठला होता. आणि कधीतरी तो येईल, तो बहिणीला आणि ममाला घेऊन येईल.”

294 मित्रांनो, मी आज कार्यक्षेत्रावर आहे. मी—मी अगदी आणखी काही सांगू शकत नाही. मी…[भाऊ ब्रॅन्हम रडतात—संपा.] देव तुमचे कल्याण करो. एक मिनिट आपले डोके लववूया.

295 हे प्रभू! बऱ्याच वेळा, प्रभु, मला खात्री आहे की लोकांना समजत नाही, जेव्हा त्यांना वाटते की या गोष्टी सहज येतात. पण एक महान दिवस येत आहे जेव्हा येशू येणार आहे आणि ही सर्व दुःखे पुसून टाकली जातील. मी प्रार्थना करतो, स्वर्गीय पित्या, तू आम्हाला तयार होण्यास मदत करशील.

296 आणि ते शेवटचे वचन, जेव्हा मी त्या दिवशी सकाळी तिच्या गालावर चुंबन घेतले, की मी तिला त्या दिवशी तिथे भेटेन. मला विश्वास आहे की ती त्या स्थानावर उभी असेल, माझे नाव घेत असेल. प्रभू, मी तेव्हापासून त्या वचनाशी खरे राहिलो आहे, जगभर, सर्व प्रकारच्या ठिकाणी, ही सुवार्ता आणण्याचा प्रयत्न करीत आहे. आता म्हातारा झालोय, आणि थकलोय, मी थकलो आहे. यापैकी एक दिवस मी शेवटच्या वेळी हे बायबल बंद करणार आहे. आणि, देवा, मला त्या वचनाशी विश्वासू ठेव. प्रभू, तुझी कृपा माझ्याभोवती ठेव. मला या जीवनातील गोष्टींकडे पाहू देऊ नको, परंतु त्या पलीकडे असलेल्या गोष्टींसाठी जगू दे. मला प्रामाणिक राहण्यास मदत करा. मी आरामदायक फुलांचा बिछाना मागत नाही, नाही, प्रभु, जेव्हा माझा ख्रिस्त दुःखात मरण पावला. आणि बाकीचे सर्व असेच मरण पावले. मी कोणतीही सोपी गोष्ट मागत नाही. प्रभु, फक्त मला प्रामाणिक राहू दे, इमानदार. लोकांना माझ्यावर प्रेम करू दे जेणेकरून मी त्यांना तुझ्याकडे आणू शकेन. आणि एके दिवशी जेव्हा हे सर्व संपेल आणि आपण सदाहरित झाडाखाली एकत्र जमू, मला तिचा हात धरायचा आहे आणि तिला वर घेऊन जायचे आहे, एंजेलस टेंपल आणि इतर सर्व लोकांना दाखवायचे आहे. तेव्हा तो खूप महान समय असेल.

297 मी प्रार्थना करतो की येथे आम्हा प्रत्येकावर तुझी कृपा राहो. आणि जे येथे आहेत, हे प्रभु, कदाचित ते ओळखतही नसतील. आणि कदाचित त्या समुद्राच्या पलीकडे त्यांची

कोणीतरी प्रिय व्यक्ती असेल. जर त्यांनी त्यांचे वचन कधीच पूर्ण केले नसेल, तर ते आता करू दे, प्रभु.

298 आपण आपली मस्तके झूकविलेली असताना, आज दुपारी या भव्य सभागृहात मला आश्चर्य वाटते, तुमच्यापैकी किती जण म्हणतात “भाऊ ब्रॅन्हम, मला सुद्धा, माझ्या प्रियजनांना भेटायचे आहे. मी—मी—माझे नदीच्या पलीकडे काही प्रिय व्यक्ती आहेत”? कदाचित तुम्ही त्यांना भेटण्याचे वचन दिले असेल, कदाचित जेव्हा तुम्ही आईला त्या दिवशी थडग्यावर “निरोप” देताना सांगितले असेल, कदाचित जेव्हा तू लहान बहिणीला सांगितलेस “निरोप,” किंवा बाबा, किंवा त्यांच्यापैकी कोणाला त्या थडग्यापाशी, आपण त्यांना भेटू असे वचन दिले, आणि तुम्ही—तुम्ही अजून तशी तयारी केली नाही. हे करण्यासाठी आता चांगली वेळ आली आहे असे तुम्हाला वाटत नाही का?

299 माझ्या रडण्याबद्दल माफ करा. पण, अरे, माझ्या, तुम्हाला कळत नाही, मित्रा. तुम्हाला माहीत नाही काय—काय बलिदान! जीवन कथेचा, कदाचित, हा एक प्रसंग नाही.

300 तुमच्यापैकी किती जणांना आता उठून इथे प्रार्थनेसाठी यायला आवडेल, म्हणा, “मला माझ्या प्रियजनांना भेटायचे आहे”? श्रोत्यांमधून वर या आणि इथे खाली या. तुम्ही ते कराल का? जर कोणी अजून तशी तयारी केली नसेल. श्रीमान, देव तुम्हाला आशीर्वाद देवो. मला एक म्हातारा कृष्णवर्णीय माणूस बाहेर येताना दिसतोय, इतर येत आहेत. तुम्ही पुढे चला, तुम्ही जे बाल्कनीमध्ये आहात, केवळ गॅलरीच्या वाटेने बाहेर जा. किंवा तुम्ही उभे राहावे, ज्यांना वाटते की आत्ताच प्रार्थनेच्या शब्दात त्यांचे स्मरण केले जावे. बस एवढेच. आपल्या पायावर सरळ उभे रहा. ते चांगले आहे. उभे राहा, सर्वत्र, तुम्ही जे कोणी म्हणाल, “माझा पिता पलीकडे आहे, माझी आई किंवा प्रिय व्यक्ती पलीकडे आहे. मला त्यांना भेटायला जायचे आहे. मला त्यांना शांतीत भेटायचे आहे.” तुम्ही उठाल का, फक्त तुमच्या जागेवर उभे राहा, प्रेक्षकांमध्ये कुठेही. आपल्या जागेवर उभे रहा, म्हणा, “मला स्वीकारायचे आहे.”

301 देव तुला आशीर्वाद देवो, बाई. देव तुम्हाला तिथे मागे आशीर्वाद देवो. आणि तिथे तुम्हाला आशीर्वाद देवो. श्रीमान, प्रभू तुम्हाला येथे आशीर्वाद देवो. ते बरोबर आहे. बाल्कनीमध्ये, प्रभु तुम्हाला आशीर्वाद देवो. आजूबाजूला, सर्वत्र, प्रार्थना करण्यासाठी आता आपल्या जागेवर उभे रहा, जेव्हा पवित्र आत्मा येथे आहे आणि आपल्या अंत:करणात फिरत आहे, ते—ते—ते फोडण्यासाठी.

302 तुम्हाला माहिती आहे, आज मंडळीला तुटण्याची गरज आहे. आपल्याला कुंभाराच्या घरात जाण्याची गरज आहे. आपले कठोर घरगुती धर्मशास्त्र कधीकधी इतके चांगले काम करीत नाही. आपल्याला जुन्या पद्धतीच्या भग्नतेची, आपल्या अंतःकरणात पश्चात्तापाची, देवाकडे नम्र होण्याची गरज आहे. हे सर्व आता उभे राहण्यास तयार आहेत का?

चला तर मग प्रार्थनेसाठी आपली मस्तके लववूया.

303 हे प्रभु, ज्याने येशूला पुन्हा आणले...मरणातून, आपल्या सर्वांना विश्वासाने, विश्वासाने नीतिमान ठरविण्यासाठी. मी प्रार्थना करतो, प्रभु, जे आता त्यांच्या पायांवर तुला स्वीकारण्यासाठी उभे आहेत, मी प्रार्थना करतो की त्यांना क्षमा मिळावी. आणि, हे प्रभु, मी प्रार्थना करतो की ते तुला त्यांचा तारणारा आणि राजा आणि प्रियकर म्हणून स्वीकारतील, आणि कदाचित त्यांचे आई किंवा वडिल किंवा कोणीतरी समुद्राच्या पलीकडे असेल. एक गोष्ट नक्की आहे, त्यांना तारणहार मिळाला आहे. त्यांना त्यांच्या पापांची क्षमा होवो, आणि

त्यांचा सर्व घोर अन्याय नष्ट होवो, जेणेकरून त्यांचे आत्मे कोकऱ्याच्या रक्ताने धुतले जातील, आणि ते यापुढे शांतीत जगतील.

304 आणि एके वैभवशाली दिवशी जेव्हा हे सर्व संपेल, तेव्हा आम्ही तुझ्या घरी एकत्र येऊ, आणि तेथे अखंड कुटुंबासारखे असू, दुसऱ्या बाजूला वाट पाहत असलेल्या आमच्या प्रियजनांना भेटण्यासाठी. हे, आम्ही त्यांना तुझ्याकडे सोपवतो, ते "ज्याचे हृदय त्याच्यावर स्थिर आहे त्याला तू परिपूर्ण शांती देतोस." प्रभू, ते प्रदान कर, जसे आम्ही त्यांना तुझ्याकडे सोपवतो. तुझ्या पुत्राच्या, प्रभु येशूच्या नावाने. आमेन.

305 देव तुम्हाला आशीर्वाद देवो. मला खात्री आहे की तुम्ही कुठे उभे आहात हे स्वयंसेवक पाहतील, आणि काही मिनिटांत ते तुमच्याबरोबर असतील.

306 आणि आता ज्यांना प्रार्थना पत्रे मिळणार आहेत. बिली, जीन आणि लिओ कुठे आहेत, ते मागे आहेत का? काही मिनिटांत ते प्रार्थना पत्रे देण्यासाठी येथे आहेत. भाऊ प्रार्थनेत श्रोत्यांना समारोप देतील, आणि प्रार्थनापत्रे दिली जातील. आजारी लोकांसाठी प्रार्थना करण्यासाठी आम्ही थोड्या वेळाने येथे परत येऊ. ठीक आहे, भाऊ.

***माझी जीवन कथा*** MAR59-0419A

(My Life Story)

हा संदेश, भाऊ विल्यम मिरीयन ब्रॅन्हम ह्यांच्या द्वारे, मूळ स्वरूपात इंग्रजीमध्ये, रविवारी दुपारी, एप्रिल 19, 1959 रोजी, एंजेलस टेम्पल लॉस एंजेलस, कॅलिफोर्निया, यू. एस. ए., येथे प्रचार केला गेला, जो चुंबकीय टेप रेरेकॉर्डिंग मधून घेतला गेला आहे आणि इंग्रजीमध्ये विस्तृत स्वरुपात छापला गेला आहे. हा मराठी अनुवाद व्हॉईस ऑफ गॉड रेकॉर्डिंगद्वारे छापला आणि वितरित करण्यात आला.

MARATHI

©2023 VGR, ALL RIGHTS RESERVED

VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE
19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM
CHENNAI 600 034, INDIA
044 28274560 • 044 28251791
india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org

## छपाईच्या हक्काची सूचना

संपूर्ण हक्क राखीव आहेत हे पुस्तक घरातील प्रिंन्टरवर स्वतःच्या उपयोगा करिता, किंवा दूस-यांना मोफत देण्या करिता, येशू ख्रिस्ताची सुवार्ता प्रसार करण्या करिता एक साधन म्हणून छापू शकता येईल. हे पुस्तक विकू शकता येणार नाही. किंवा फार मोठया प्रमाणावर प्रती काढण्यास मनाई आहे. किंवा वेबसाईडवर प्रसार करण्यास मनाई आहे. कोणत्याही प्रकारच्या पुर्नःप्राप्ति प्रणाली मधून नक्कल करण्यास मनाई आहे. दूस-या भाषेत भाषांतर करण्यास किंवा रक्कम गोळा करण्यास मनाई आहे. या सर्व गोष्टीं करण्याकरिता Voice Of God Recordings यांची लिखित परवानगी घेणे आवश्यक आहे.

अधिक माहिती करिता किंवा इतर उपलब्ध गोष्टीं करिता कृपया संपर्क साधा.

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org